नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २७८ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक ४ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

## एका वर्षासाठी फटाके वाजवण्यास बंदी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :
दिल्ली-एनसीआरमध्ये फटाक्यांच्या निर्मिती, साठवणूक आणि विक्रीवरील बंदी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी एका वर्षाने वाढवली. न्यायमूर्ती अभय एस. ओका आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुईयान यांच्या खंडपीठाने सांगितले की, वायू प्रदूषणाची पातळी बऱ्याच काळापासून धोकादायक राहिली आहे.

लोकसंख्येचा एक मोठा भाग रस्त्यावर काम करतो आणि प्रदूषणाचा सर्वाधिक परिणाम त्यांच्यावर होतो. प्रत्येकजण घरात किंवा ऑफिसमध्ये एअर प्युरिफायर बसवू शकत नाही, जोपर्यंत न्यायालयाला खात्री होत नाही की प्रदूषण खूपच कमी होते, तोपर्यंत मागील आदेशांवर पुनर्विचार करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# कपातीची कपात

परवा म्हणजे 30 तारखेला वृत्तपत्रात एक आशादायक बातमी प्रकाशित झाली. त्यानुसार एक एप्रिल पासून महाराष्ट्राच्या वीज दरात कपात होणार होती. त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी आयात केलेला कोळसा महाग असतो. त्यामुळे वीज दर वाढले. आता सुयोग्य समायोजनामुळे आणि वीज निर्मितीच्या क्षेत्रात नवीन स्त्रोत निर्माण झालेले आहेत. त्यामुळे वीज दरात कपात करण्यात येणार होती. ती कपात दहा ते बारा टक्के होणार होती. म्हणजेच जनतेला महागाईच्या काळात निदान महिन्याचे आठ,दहा दिवसांच्या चहा इतके पैसे वाचणार होते. पण एक एप्रिलला असे सांगण्यात आले की, ही बातमी एप्रिल फुल सारखी आहे. जनतेला निवडणुकीपूर्वी अनेक आश्वासने देण्यात येतात. पण निवडणूक नसताना जनतेसाठी सरकारकडून त्याच यंत्रणेद्वारे वसुली होते. त्यामुळे कपात होईल असे सांगणे ही मोठी आश्चर्याची गोष्ट होती. सर्वच बाबतीत एकदा वाढवलेले दर कमी होतील. असे गृहीत धरणे आता जनतेने सोडून दिलेच पाहिजे. परवा कपातीत कपात करण्याची घोषणा करून वीज नियामक आयोगानेच कपातीलाच कपात का दिली. याचे कारण सांगण्यात आले ते वेगळेच निघाले. वीज नियामक आयोगाने छोट्या ग्राहकांऐवजी मोठ्या उद्योजकांना प्राधान्य दिलेले होते. त्यामुळे महावितरणचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळेच वीज नियामक आयोगाने जो दर कपातीचा आदेश दिला होता. तो मागे घेतला. आता काय झाले असेल, कोणते गणित लावले गेले असेल. हे आम्हा ग्राहकांना काही समजत नाही आणि समजणारही नाही. वीजदर कपातीचा आदेश आला तेव्हा आनंद वाटला आणि आता रद्द झाला. तेव्हा त्याबद्दल विषाद वाटला. खरे तर ही सामान्य जनतेसाठी आश्चर्याची गोष्ट होती, असे म्हटले पाहिजे. आपण लवकरच वीज कपात करणार आहोत. असे महावितरणने म्हटलेले आहे. तसे पाहिले तर महावितरणकडे अशी कपात करण्याची व्यवस्था दिसत नाही. महावितरणने वीज नियामक आयोगाकडे दर कपात मागे घ्यावी म्हणून विनंती केली होती. त्यामुळेच महावितरणचा तोटा वाढून कोणतीही गडबड होऊ नये. म्हणूनच आपण हा निर्णय घेतल्याचे महावितरण म्हणते. म्हणूनच दोन दिवसात भोळ्या भाबड्या जनतेची चांगलीच करमणूक झाली. त्याच जनतेला थोड्या प्रमाणात का होईना, आनंदही झालेला दिसला. अर्थात हे ही काही कमी नाही. भविष्यकाळात वेगळ्या मार्गाने वीज कपात करण्याचा महावितरणने प्रयत्न करावा व तसे झाले म्हणून त्यांनी कपात करावी. म्हणजे जनतेला दररोज वीज कपातीचा झटका बघून अंधारात राहण्याची गरज पडू नये. अशीही व्यवस्था करावी हीच सर्वसामान्य जनतेची अपेक्षा आहे. विजेच्या दरात कपात ते कपातीच्या दरात कपात हा 'मजेदार योगायोग' आहे. असे आपण आता समजूया!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## १२ तासांच्या चर्चेनंतर वक्फ दुरुस्ती विधेयक

# लोकसभेत मंजूर!

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ३ :
अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी गुरुवारी वक्फ दुरुस्ती विधेयक राज्यसभेत मांडले. त्यांनी सांगितले की, व्यापक चर्चेनंतर तयार केलेले विधेयक जेपीसीकडे पाठवण्यात आले. जेपीसीने जितके काम केले तितके कोणत्याही समितीने वक्फवर केलेले नाही. तत्पूर्वी, बुधवारी रात्री उशिरापर्यंत झालेल्या चर्चेनंतर, हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले.

वक्फ दुरुस्ती विधेयक बुधवारी लोकसभेत १२ तास-ांच्या चर्चेनंतर मंजूर करण्यात आले. पहाटे २ वाजता झालेल्या मतदानात ५२० खासदारांनी भाग घेतला. २८८ जणांनी बाजूने तर २३२ जणांनी विरोधात मतदान केले. अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी याला उमीद (युनिफाइड वक्फ मॅनेजमेंट एम्पॉवरमेंट, एफिशियन्सी अँड डेव्हलपमेंट) असे नाव दिले आहे. विधेयक आज राज्यसभेत सादर करण्यात आले.

रिजिजू यांनी राज्यसभेत सांगितले, सुधारित विधेयकानुसार, कोणताही गैर-मुस्लिम मुस्लिमांच्या धार्मिक कार्यात कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करणार नाही. आम्ही पारदर्शकता, जबाबदारी आणि अचूकतेवर लक्ष केंद्रित करून बदल केले आहेत. आम्ही येथे कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्यासाठी नाहीत. आमचे उद्दिष्ट गरीब मुस्लिमांना न्याय मिळावा हे आहे.

राजद खासदार मनोज कुमार झा म्हणाले की, लालू यादव यांचा एक व्हिडिओ कापून प्ले करण्यात आला. त्यांची भाषणे संसदेच्या संग्रहात आहेत. त्यांनाही तसेच चालवायला हवे होते. बहुमत ही स्वातंत्र्याची हमी नाही. या देशातील हिंदूंना मुस्लिमांची सवय आहे. मुस्लिमांना हिंदूंची सवय आहे. ही सवय बदलू नका.

विधेयकावर चर्चा सुरू असतानाच एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी विधेयक फाडले. ते म्हणाले, या विधेयकाचा उद्देश मुस्लिमांना अपमानित करणे आहे. मी गांधींसारखे वक्फ बिल फाडतो.

विधेयकावरील चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, गैर-इस्लामी गोष्टी वक्फमध्ये समाविष्ट केल्या जाणार नाहीत. अशी कोणतीही तरतूद नाही. मतपेढीसाठी अल्पसंख्याकांना धमकावले जात आहे.

बुधवारी भाजप खासदार अनुराग ठाकूर यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर केलेल्या विधानावरून सकाळीच विरोधी पक्षाच्या खासदारांनी राज्यसभेत गदारोळ केला.

ठाकूर म्हणाले होते की कर्नाटकातील वक्फ जमिनीत भ्रष्टाचार झाला आहे. यामध्ये काँग्रेस अध्यक्ष खरगे यांचाही समावेश आहे. यावर खरगे म्हणाले, आरोप सिद्ध करा किंवा राजीनामा द्या.

जर अनुराग ठाकूर यांनी हे सिद्ध केले की त्यांच्याकडे किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याकडे वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या १ इंचावरही ताबा आहे, तर मी राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा देईन.

लोकसभा

### वक्फ विधेयकावर मतदान



एकूण पडलेली मते: 520

| बाजूने | विरोधात |
|---|---|
| 288 | 232 |

## उद्धव ठाकरे म्हणजे युटी अर्थात 'युज अँड थ्रो'

### ठाकरेंच्या 'एसंशिं' टीकेला एकनाथ शिंदेंचे प्रत्युत्तर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी वक्फ सुधारणा विधेयकावरून उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली.



उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे कालचे कृत्य बाळासाहेबांचे विचार अजूनही ज्यांच्या मनात आहेत, त्यांना मान खाली घालायला लावण्यासारखे होते. काय बोलायचे? काय निर्णय घ्यायचा? व काय करायचे? हे सूचत नसलेले उबाठा नेतृत्व या निमित्ताने महाराष्ट्राला दिसले, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणजे युटी अर्थात 'यूझ अँड थ्रो', असा पलटवारही त्यांनी यावेळी ठाकरेंच्या 'एसंशिं' टीकेला प्रत्युत्तर देताना केला.

केंद्राने वक्फ विधेयक जमिनींवर डोळा ठेवून आणल्याचा आरोप ठाकरे यांनी केला होता. त्यांच्या या टीकेवर शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांचे विचार अजूनही ज्यांच्या मनात आहेत त्यांना मान खाली घालवण्यासारखे कृत्य काल झाले. त्यांच्या लोकप्रतिनिधींनीही खंत व्यक्त केली.

कालचा दिवस हा उबाठासाठी अत्यंत दुर्दैवी होता. त्यांनी वक्फ बोर्ड बिल व हिंदुत्वाचा काही संबंध नसल्याचा दावा केला. ते अतिशय गोंधळलेल्या स्थितीत सापडल्याचे स्पष्ट होते, असे शिंदे म्हणाले . काय बोलायचे, काय निर्णय घ्यायचा, काय करायचे हे सूचत नसलेले उबाठा नेतृत्व काल दिसले.

उद्धव ठाकरेंची स्थिती धरले की चावतंय आणि सोडलं की पळतंय अशी झाली आहे. बाळासाहेबांचा राष्ट्रभक्त मुस्लिमांना पाठिंबा होता. तीच भूमिका शिवसेनेची आहे. हीच भूमिका भाजप व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही आहे. जो मुस्लिम देशभक्त व राष्ट्रभक्त आहे, ज्याचे या देशावर प्रेम आहे, त्याला आमचा पाठिंबा आहे. पण देशविरोधी कृत्य करणाऱ्यांना, मग ते कुणीही असले तरी आमचा त्यांना विरोध आहे. ही भूमिका घेऊन बाळासाहेब अखंडपणे घेऊन चालले. तीच भूमिका या वक्फ बोर्डाच्या माध्यमातून भाजपने दाखवली.

## शिर्डी, तिरुपती बोर्डावर आम्हाला घेणार का?

### इम्तियाज जलील यांचा भाजपला सवाल

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ३ :
एमआयएमचे नेते तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांनी वक्फ सुधारणा विधेयकावरून भाजपवर तिखट हल्ला चढवला आहे.



भाजप वक्फ सुधारणा विधेयकाद्वारे वक्फ बोर्डात हुशार नॉन मुस्लिम सदस्य आणणार आहे. मग आमच्या समाजात हुशार लोक नाहीत का? आता ते आम्हाला शिर्डी व तिरुपती संस्थानच्या बोर्डावर घेणार का? केवळ वक्फसाठीच हा निर्णय का? असे विविध प्रश्न जलील यांनी या प्रकरणी उपस्थित केलेत. जलील यांनी गुरुवारी या प्रकरणी बोलताना भाजपवर टीकेची झोड उठवली. ते म्हणाले, आम्ही वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध केला.

## भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष

# थायलंडला पाठवू : मोदी



■ वृत्तसंस्था, बँकांक, दि. ३ :
पंतप्रधान शिनावात्रा यांनी मला त्रिपिटक भेट दिली. 'बुद्धांची भूमी' असलेल्या भारताच्या वतीने, मी ते आदराने स्वीकारले. गेल्या वर्षी भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष भारतातून थायलंडला पाठवण्यात आले होते. मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, १९६० मध्ये गुजरातच्या अरवलीमध्ये सापडलेले भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष देखील थायलंडला पाठवले जातील, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. ते आज म्हणजेच गुरुवारी दोन दिवसांच्या थायलंड दौऱ्यावर पोहोचले. येथे त्यांनी थायलंडचे पंतप्रधान पाइतोंग्तार्न शिनावात्रा यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित केले.

सर्वप्रथम, पंतप्रधान मोदींनी २८ मार्च रोजी झालेल्या भूकंपात प्राण गमावलेल्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी भारत आणि थायलंडमधील धार्मिक आणि सांस्कृतिक संबंधांवर चर्चा केली.

ते म्हणाले की, आपले शतकानुशतके जुने संबंध आपल्या खोल सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बंधांशी जोडलेले आहेत. बौद्ध धर्माच्या प्रसाराने आपल्या लोकांना एकत्र आणले आहे. रामायणातील कथा थाई लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत.

मोदी म्हणाले की, दोन्ही देशांमध्ये एमएसएमई, हातमाग आणि हस्तकला क्षेत्रात सहकार्यासाठी करार झाला आहे. अक्षय ऊर्जा, डिजिटल तंत्रज्ञान, ई-वाहने, रोबोटिक्स, अवकाश, जैवतंत्रज्ञान आणि स्टार्ट-अप्समध्ये सहकार्य वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन्ही देशांमधील फिनटेक कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी काम केले जाईल. भारताने थाई पर्यटकांसाठी ई-व्हिसा देण्यास सुरुवात केली आहे.

तत्पूर्वी, थायलंडची राजधानी बँकॉक येथे पोहोचल्यानंतर, पंतप्रधान मोदींनी विमानतळावर भारतीय समुदायाच्या लोकांना भेटले. मोदींनी नंतर थायलंडचे पंतप्रधान पाइतोंग्तार्न शिनावात्रा (३८) यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली. त्या जगातील सर्वात तरुण पंतप्रधान आहेत. यावेळी दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी व्यापारी संबंधांवर चर्चा केली.

पंतप्रधान म्हणाले की, भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणात आणि आमच्या इंडो पॅसिफिक दृष्टिकोनात थायलंडचे विशेष योगदान आहे. आज आपण आपले संबंध धोरणात्मक भागीदारीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षा संस्थांमध्ये धोरणात्मक संवाद स्थापित करण्यावर चर्चा झाली.

मोदी शुक्रवारी थायलंडचे राजा महा वजिरालोंगकोर्न आणि राणी सुथिदा यांचीही भेट घेतील. याशिवाय, पंतप्रधान मोदी बिमस्टेक परिषदेत सहभागी होतील. या परिषदेनंतर ते बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख युनूस खान यांनाही भेटू शकतात.

## वीज कोसळून महिलेसह दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ३ :
शेतात काम करण्यासाठी गेलेल्या दोघांचा वीज कोसळल्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरूवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास पाथरी येथे घडली. मनिषा भारत पुष्पतोडे (२५) आणि प्रमोद नागपुरे (४५) असे मृतकांची नावे असून, दोघेही पाथरी येथील रहिवासी होते.

आज सकाळपासूनच विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. सध्या शेतीची कामे असल्याने शेतमजुरांची लगबग सुरू होती. तुमसर तालुक्यातील पाथरी येथे दुपारच्या सुमारास शेतावर काम करीत असताना वीज कोसळून एका महिलेचा आणि एका पुरुषाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## शिवसेनेचे 'बुकमायशो'ला पत्र कुणाल कामराच्या अडचणींत वाढ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
शिवसेनेचे सोशल मीडिया राज्यप्रमुख तथा युवासेनेचे सरचिटणीस राहुल कनाल यांनी 'बुकमायशो' ला पत्र लिहून स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराचे शो प्रदर्शित किंवा प्रमोट करणे टाळण्याची मागणी केली आहे. यामुळे कुणाल कामराच्या अडचणींत आणखी भर पडण्याची शक्यता आहे.



राहुल कनाल यांनी बुकमायशोची पॅरेंट कंपनी बिग ट्री एंटरटेन्मेंट प्रायव्हेट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष हेमराजनी यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी वरील मागणी केली आहे.

ते आपल्या पत्रात म्हणतात, मी याद्वारे बिग ट्री एंटरटेन्मेंटचे प्रतिष्ठित व्यासपीठ बुकमायशोच्या कामकाजाशी संबंधित एक बाब निदर्शनास आणून देत आहे. या व्यासपीठाने कुणाल कामरा नामक व्यक्तीच्या कार्यक्रमासाठी तिकीट विक्रीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. परंतु, 'बुकमायशो'वर तिकीट विक्री करू नका, अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

## पुरुष हक्क आयोगाची राज्यात स्थापना करा

### तृप्ती देसाईंनी घेतला पुढाकार

■ वृत्तसंस्था
सोलापूर, दि. ३ :
देशात तसेच राज्यातील अनेक भागांमध्ये कौटुंबिक कलहातून पुरुष आत्महत्या करत असल्याच्या तसेच पती-पत्नीच्या वादातून पतीची हत्या केल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर आता पुरुष हक्क आयोगाची स्थापना करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.



राज्यात सध्या ज्या पद्धतीने महिलांकडून क्रूर हत्येचे प्रकार समोर येत आहेत, ते पाहता पुरुषांना न्याय व अधिकार देण्यासाठी पुरुष हक्क आयोगाची स्थापना करण्याची गरज वाटू लागली असल्याचे भूमाता ब्रिगेड संघटनेच्या प्रमुख तृप्ती देसाई यांनी म्हटले आहे.

पुरुष आणि महिला दोघांनाही समान न्याय असला तरी पूर्वी महिलांवर होणरे अत्याचार थांबवण्यासाठी महिला आयोगाची स्थापना झाली होती. मात्र, सध्याच्या काळात पुरुषांसाठी पुरुष हक्क आयोगाची निर्मिती करण्याची वेळ आली असल्याचे तृप्ती देसाई यांनी म्हटले आहे.

नुसते समुपदेशन करून भागणार नसून महिलांनाही आपण काय वागतो याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. राज्यात पुरुष हक्क आयोग स्थान झाल्यास पुरुषांनाही न्याय व अधिकार मिळतील, असे त्या म्हणाल्या.

## ४ हजार चौ.किमी जमिनीवर चीनचा कब्जा

### राहुल गांधीची माहिती

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :
भारत-चीन राजनैतिक संबंधांच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमावरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी सरकारला घेरले. ते म्हणाले, चीनने आपल्या ४ हजार चौरस किलोमीटर भूभागावर कब्जा केला आहे, पण आमचे परराष्ट्र सचिव (विक्रम मिश्री) चिनी राजदूतासोबत केक कापत होते हे पाहून मला आश्चर्य वाटले. लोकसभेत शून्य प्रहरात बोलताना राहुल म्हणाले, आम्ही सामान्यतेच्या विरोधात नाही, पण त्याआधी आम्हाला आमची जमीन परत मिळाली पाहिजे. मला कळले की राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी चिनी राजदूतांना पत्र लिहिले आहे आणि आम्हाला इतरांकडूनही याबद्दल माहिती मिळत आहे. चिनी राजदूत भारतातील लोकांना सांगत आहेत की त्यांना एक पत्र लिहिले गेले आहे.

मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणावर राहुल गांधी म्हणाले, एकीकडे तुम्ही आमची जमीन चीनला दिली आणि दुसरीकडे अमेरिकेने आमच्यावर टॅरिफ (टिट फॉर टॅट टॅक्स) लादला. यामुळे देशातील वाहन उद्योग, औषधनिर्माण आणि शेती पूर्णपणे नष्ट होईल.

एकदा कोणीतरी इंदिराजींना विचारले की त्या परराष्ट्र धोरणात डावीकडे झुकतात की उजवीकडे? यावर त्यांनी उत्तर दिले की मी डावीकडे किंवा उजवीकडे झुकत नाही. मी एक भारतीय आहे आणि मी सरळ उभी आहे.

भाजप आणि आरएसएसचे तत्वज्ञान वेगळे आहे. विचारल्यावर ते म्हणतात नाही, नाही, आम्ही प्रत्येक परदेशी व्यक्तीसमोर आपले डोके टेकवतो. ते त्यांच्या इतिहासात आहे,



आपल्याला माहिती आहे. अमेरिकेच्या शुल्कांवर ते काय करत आहे याचे उत्तर सरकारने द्यावे.

काल अमेरिकेने भारतावर २७ टक्के टिट फॉर टॅट कर लादण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेने म्हटले आहे की भारत अमेरिकन वस्तूंवर खूप जास्त आयात शुल्क लादतो.

दरम्यान, वक्फ दुरूस्ती विधेयकावर चर्चा सुरू असताना विषय वळवल्याने सत्ताधारी भाजपाच्या मंत्र्यांनी विरोधकांवर टीकेच झोड उठविली. येथे वक्फ सुधारणा विधेयकावर चर्चा सुरू आहे आणि हे चीन, राम मंदिर, कुंभ, बिहार निवडणूक अशा मुद्यांवर बोलून वेळ वाया घालवत आहेत.

## दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा

### गर्भवतीच्या उपचारासाठी मागितले १० लाख, भाजप आमदाराच्या पीएच्या पत्नीचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ :
पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाला रुग्णापेक्षा पैसा महत्त्वाचा झाला आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

येथील प्रशासनाच्या मुजोरपणामुळे एका गर्भवती महिलेला आपला जीव गमवावा लागला आहे. दोन गोंडस जुळ्या मुलांना जन्म देऊन या आईचा मृत्यू झाला आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. तसेच नामांकित अशा दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

तनिषा भिसे यांना प्रसुतीच्या वेदना सुरू झाल्यावर तातडीने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारासाठी रुग्णालय प्रशासनाने दहा लाख रुपयांची मागणी केली.

इतके पैसे कसे आणायचे असा प्रश्न गर्भवती महिलेच्या कुटुंबीयांना पडला. तेव्हा जवळ सध्या दोन लाख रुपये आहेत, तेवढे घेऊन उपचार सुरू करण्याची विनंती कुटुंबीयांनी केली. मात्र तरी देखील महिलेला प्रसुतीसाठी दाखल करून घेतले नाही. त्यानंतर गर्भवती महिलेला दुसऱ्या रुग्णालयात नेण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला.



गर्भवती महिलेला दुसऱ्या रुग्णालयात नेत असताना महिलेला त्रास झाला आणि दोन जुळ्या मुलांना जन्म देऊन महिलेने श्वास सोडला. या घटनेने भिसे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या मुजोरपणामुळे या महिलेला जीव गमवावा लागला, असा आरोप केला जात आहे. या रुग्णालयाला जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा झाला आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, मृत महिलेचे पती सुशांत भिसे हे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक आहेत. रुग्णालयाच्या प्रशासनाच्या मुजोर कारभाराची माहिती सुशांत भिसे यांनी कळवली असता तेव्हा मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून रामेश्वर नाईक यांनी फोन केला. तरी देखील रुग्णालय प्रशासनाने त्यांचे ऐकले नाही. याचा परिणाम म्हणजे गर्भवती महिलेला आपला जीव गमवावा लागला. या घटनेची आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली असल्याचे समजते.

या प्रकरणावर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी देखील टीका केली आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणाबाबत संबंधित आमदार आता मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करण्यात असल्याचे समजते.

## बीड जिल्हा कोणामुळे बदनाम झाला?



■ **मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून बीडमध्ये गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, टोळीयुद्धाची देखील अनेक प्रकरणं समोर आली आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, हे प्रकरण सध्या राज्यभरात गाजत आहे. या मुद्द्यावर आज अजित पवार यांनी भाष्य केलं आहे, ते बीडमध्ये बोलत होते.

काही चुकीच्या लोकांकडे दुर्लक्ष केल्यामुळे आणि नको तेवढी मोकळीक दिल्यामुळे बीड जिल्हा बदनाम झाला आहे. मात्र आता पुन्हा एकदा बीड जिल्ह्याला लौकिक मिळून द्यायचा आहे. बीडमधील विकृत लोकांना सरळ करणार म्हणजे करणार. कोणी कितीही मोठ्या बापाचा असो किंवा कोणत्याही नेत्या जवळचा असो त्याला सरळ करणार म्हणजे करणार. नवीन पिढीला आवाहन करतो की आईच्या पोटातून कोणी शिकून येत नाही, पण जिद्द आणि चिकाटीच्या बळावर माणूस कुठपर्यंत जाऊ शकतो हे आजच्या लोकांकडून कळतं, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी प्रसारमाध्यांचे देखील कान टोचले आहेत. वस्तूस्थितीला धरून बातम्या दिल्या पाहिजेत, टी आर पी साठी कधी कधी बातम्या रंगवून सांगितल्या जातात, मात्र तसे करू नका. त्यामुळे एखाद्या शहराची बदनामी होऊ नये. बीड आणि बिडकरांची बदनामी थांबवण्यासाठी एकत्र आले पाहिजे. चुकीच्या गोष्टीला समर्थन न करता सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकत्र आले पाहिजे.

ग्रामीण मराठी पत्रकारितेला एक विशेष परंपरा आहे. विविध लढ्यात पत्रकारितेचे मोठे योगदान आहे. ते टिकवले पाहिजे. मीडियाने वाईटाला वाईट आणि चांगल्याला चांगले म्हटलं पाहिजे. मीडिया ट्रायलमुळे एखादा माणूस आयुष्यातून उध्वस्त होतो. अकचा वापर पत्रकारितेलाही केला पाहिजे. आता ते सगळ्या क्षेत्रात वापरले जाणार आहे, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे, दरम्यान बीड जिल्ह्यात शहरापासून 10 ते 15 किलोमीटर अंतरावर विमानतळ उभारणार असं अश्वासन देखीलअजित पवार यांनी यावेळी दिलं आहे.

## वक्फ सुधारणा विधेयक म्हणजे भ्रष्टाचार



**मुंबई :** वक्फ बोर्डाच्या जमिनी आम्ही विक्री करू, असे काल अमित शहाच्या तोंडून निघाले, असा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. कालपर्यंत आम्ही वक्फच्या संपत्तीला हात लावणार नाही, आम्ही त्याचे रक्षण करते आहोत, असे ते सांगत होते. मात्र, त्यांच्या तोंडून काल नकळत खरे बाहेर पडले, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

वक्फ बोर्डाच्या जमिनीतून त्यांना पैसे मिळवायचे आहेत. या जमिनीचा त्यांना व्यापार करायचा आहे. दोन लाख कोटी रुपयांच्या वरती या जमिनी आहेत. त्या जमिनीवर डोळा असल्यामुळेच हे विधेयक मंजूर करण्यात आले असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. वक्फ बोर्ड मध्ये होणारा हा भ्रष्टाचार आहे. आम्ही या भ्रष्टाचाराच्या विरोधातच मतदान केले असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

वक्फ बोर्ड संदभार्तील आमच्या पक्षाच्या भूमिकेविषयी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आज पत्रकार परिषद घेणार आहेत. ते या पत्रकार परिषदेमध्ये या संदभार्तील भूमिकेवर स्पष्टपणे बोलणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. हे विधेयक मंजूर झाले, या माध्यमातून देशभरात फार मोठी क्रांती करत आहोत, अशा प्रकारचे वातावरण तयार करण्यात आले. मात्र, ते बिल मंजूर झाले आणि पंतप्रधान परदेश दौऱ्यावर गेले आहेत. या बिलामुळे या देशांमध्ये काय होणार? यापूर्वी काय झाले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हा सर्व व्यवहार मुस्लिमांच्या संपत्तीवर कब्जा मिळवण्यासाठी असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. गरीब मुसलमानांचा यातून उद्धार होणार आहे, अशी भाषा काल सरकारच्या वतीने करण्यात आली. ही पूर्णपणे धुळफेक असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

## ठाकरे गटाला परभणीत मोठा हादरा

**परभणी:** स्थानिक पातळीवरील नेतेमंडळीही आपल्या आपली राजकीय सोय लक्षात घेऊन पक्ष बदल करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मराठवाड्याच्या राजकारणात सध्या मोठी उलथापालथ होत आहे. छत्रपती संभाजीनगरानंतर आता परभणी जिल्ह्यात महाविकास आघाडीतील गटकपक्षांना मोठे धक्के आणि हादरे बसत आहेत.

महाविकास आघाडीचे घटकपक्ष असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांना मराठवाड्यात झळ बसण्यास सुरुवात झाली आहे. छत्रपती संभाजी नगरातील पश्चिम विधानसभा प्रमुख राजू शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या पक्षाला रामराम केले आहे. लवकरच ते भाजपात जाणार असल्याचे म्हटले जात आहे. त्यानंतर आता उद्धव ठाकरे तसेच खासदार शरद पवार यांच्या पक्षाला परभणीतूनही मोठा धक्का बसला आहे. परभणीत स्थानिक पातळीवर मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या आहेत. येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांना भाजपाने धक्का दिला आहे. येथे अनेक उच्चपदस्थ नेत्यांनी भाजपात प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण तसेच राज्यमंत्री मेघना बोर्डीकर उपस्थित होत्या. या पक्षप्रवेश सोहळ्यात ठाकरे गटाच्या माजी जिल्हाध्यक्षांनी भाजपात प्रवेश केला आहे. तसेच पूर्णा कृषी उत्पन्न बाजार समितीचं संपूर्ण संचालक मंडळच भाजपात दाखल झालं आहे.

# मी जरी डॉक्टर नसलो तरी...



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** माजी आरोग्य मंत्री आणि कुपोषण टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांना कोल्हापूरमधील शिवाजी विद्यापीठाच्या वतीनं पी. एच. डी. प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील उपस्थिती होती. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी दीपक सावंत यांचं कौतुक केलं आहे, सोबतच पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचं नाव न घेता एकनाथ शिंदे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.

माजी आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांना कोल्हापूरमधील शिवाजी विद्यापीठाच्या वतीनं पी. एच. डी. प्रदान करण्यात आली. शहरातील वायबी चव्हाण सभागृहात यानिमित्तानं कौतुक सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात बोलताना एकनाथ शिंदे यांनी चौफेर फटकेबाजी केली.

दीपक सावंत यांचा प्रवास सर्वांनी पाहिला आहे, ते एक विश्वासू कार्यकर्ता आहेत. सोबत कोणी असेल तर मार्गदर्शन चांगलं होतं आणि अशी पदवीधर माणसं मिळतात. दीपक सावंत यांनी कोविडमध्ये जे काम केलं ते सर्वांच्या लक्षात आहे.

अनेकांना माहिती नसेल मला देखील माझं शिक्षण अर्ध्यावर सोडावं लागलं. राज्यात सर्वसामान्य माणसांचं सरकार स्थापन झालं. कोविड काळामध्ये काय होणार हे कोणालाच माहीत नव्हतं. दीपक सावंत यांनी चांगलं काम केलं असं यावेळी एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

मला काही लोकांनी हलक्यात घेतलं होतं, तसा मी काही हलक्यात घेण्यासारखा नव्हतो. काही हॉस्पिटल आणि डॉक्टरची टीम आहे, आपण देखील आरोग्य विभाग उभा करू शकतो. मी जरी डॉक्टर नसलो तरी मोठं मोठी ऑपरेशन केली आहेत, कोणाचा मानेचा पट्टा, कमरेचा पट्टा सरळ केला आहे, असे सांगत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्षरित्या टीका केली आहे.

## बोर्ड ऑफ एप्रेंटीसशिप ट्रेनिंग व महाराष्ट्र सरकार यांच्यात सामंजस्य करार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना कौशल्यवृद्धी, औद्योगिक अनुभव आणि रोजगारक्षमतेच्या संधी मिळाव्यात यासाठी राज्य सरकार आणि बोर्ड ऑफ एप्रेंटीसशिप ट्रेनिंग (पश्चिम विभाग), शिक्षा मंत्रालय, केंद्र सरकार आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

हा करार मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत शासकीय निवासस्थान सिंहगड येथे करण्यात आला. यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, बोर्ड ऑफ एप्रेंटीसशिप ट्रेनिंगचे संचालक पी. एन. जुमले, तंत्र शिक्षण मंडळ संचालक डॉ. प्रमोद नाईक, उपसंचालक एन. एन. वडोदे आदी उपस्थित होते.

नॅशनल एप्रेंटीसशिप ट्रेनिंग स्कीम अंतर्गत AEDP कोर्सेस समाविष्ट करण्यात आले असून, विद्यार्थ्यांना एप्रेंटीसशिपसाठी अधिक संधी आणि विद्यावेतन मिळणार आहे. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना दर महिन्याला किमान ८ हजार रुपये विद्यावेतन मिळणार असून, त्यातील ५०% रक्कम केंद्र सरकारकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

**सर्व पदवीधरांसाठी एप्रेंटीसशिप संधी**

संचालक पी. एन. जुमले यांनी सांगितले की, पूर्वी केवळ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी एप्रेंटीसशिप उपलब्ध होती. मात्र, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत सर्व पदवीधर आणि डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांनाही एप्रेंटीसशिप संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**भव्य रोजगार मेळावे होणार**

महाराष्ट्रातील १० विभागीय कार्यालयांच्या माध्यमातून विविध महाविद्यालयांसाठी भव्य रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

## औरंगजेबाची कबर गनिमी काव्याने तोडणार



■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ३ :** आदिनाथ संप्रदायाचे पीठाधीश्वर तथा हिंदू जोडो यात्रेचे प्रमुख कल्कीराम महाराज यांनी मुघल बादशहा औरंगजेबाची कबर गनिमी काव्याने तोडण्याची घोषणा केली आहे. यासाठी ते एक भला मोठा प्रतिकात्मक हातोडा घेऊन छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने निघाले होते. पण पोलिसांनी वेळीच त्यांना रोखले. छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी त्यांना एक नोटीस बजावली आहे.

हिंदू व हिंदुत्व विरोधी औरंगजेबाच्या कबरीला सरकार संरक्षण का देत आहे? आम्ही ही कबर जरूर उद्धवस्त करू. आम्ही मराठा व मराठीचे अस्तित्व संपवण्यासाठी आलेल्या औरंगजेबाच्या सर्वच खानाखुणा आम्ही पाठ्यपुस्तके व महाराष्ट्राच्या भूमीतून पुसून टाकू, छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आयुष्यभर औरंगजेबाचा सामना केला. त्याच्यामुळे अवघा देश त्रस्त होता. ज्याने छत्रपती संभाजी महाराज यांची निर्घृण हत्या केली. त्याच्या कबरीवरून सरकार एवढे चिंताग्रस्त का आहे? असा सवाल त्यांनी केला.

## वक्फ सुधारणा बिलाला विरोध करून उद्धव ठाकरेंनी काँग्रेसचे विचार स्वीकारले



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** भारतीय जनता पक्षाचे (भाजपा) प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पत्रकार परिषदेत विविध मुद्द्यांवर भाष्य करताना शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. वक्फ सुधारणा विधेयक, एक राज्य एक नोंदणी, वीज दर, रेडीरेकनर आणि मुंबईतील बनावट नकाशांवर त्यांनी सविस्तर माहिती दिली.

बावनकुळे म्हणाले, १ मेपासून एक राज्य एक नोंदणी योजना सुरू होत आहे. यामुळे नागपूरात घर घेतले तरी पुण्यातून नोंदणी करता येईल. आधारकार्ड आणि इन्कम टॅक्ससंदर्भात फेसलेस नोंदणीची सुविधाही उपलब्ध होईल. ही योजना नागरिकांसाठी सोयीस्कर ठरेल.

**उद्धव ठाकरे आणि वक्फ बोर्ड**

उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना ते म्हणाले, उद्धव ठाकरेंनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले आहेत. वक्फ सुधारणा बिलाला विरोध करून त्यांनी काँग्रेसचे विचार स्वीकारले आणि विशिष्ट समाजाच्या मतांसाठी लांगूलचालन केले. हे मतदान देशाचा आणि महाराष्ट्राचा अपमान आहे. जनता त्यांना माफ करणार नाही.

ज्या खासदारांना निवडून दिले, तिथे लोकांना आता चूक झाल्याची जाणीव होईल. पुढे उद्धव ठाकरेंचे उमेदवार निवडून येणार नाहीत. त्यांनी पुढे सांगितले की, शिवसैनिक आज पक्ष सोडण्याच्या मानसिकतेत आहेत.

**वीज दर आणि सौर ऊर्जा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करताना बावनकुळे म्हणाले, फडणवीस यांचे आभार मानतो. शेतकऱ्यांना स्वस्त दरात वीज देऊन त्यांना सौर ऊर्जेवर आणले. सौर वाहिनी योजनेमुळे क्रॉस सबसिडी कमी झाली, त्यामुळे वीजबिल कमी झाले. ग्राहकांना कमी दरात वीज मिळत असताना कुणीही विरोध करू नये. या योजनेसाठी फडणवीसांचे अभिनंदन.

रेडीरेकनर दरांबाबत ते म्हणाले, मुंबईत फॉर सिझनला जो दर लागतो, तोच शेजाऱ्यालाही लागतो. झोनिंग नसल्याने ही समस्या आहे. वर्षभरात आम्ही झोनिंग करणार आहोत. जीपीएस मॅपिंग आणि सिटीसीद्वारे हे काम होईल. पुढील वर्षी रेडीरेकनर झोननुसार निश्चित होईल.

मुंबईतील अनधिकृत बांधकामांवर बोलताना बावनकुळे म्हणाले, १६५ बनावट नकाशे तयार झाले आणि ४६५ बांधकामे अनधिकृतपणे बांधली गेली. आम्ही सर्व नकाशे रद्द केले असून, पालिकेला ही बांधकामे पाडण्याचे आदेश दिले आहेत. यात काही अधिकारी सामील आहेत आणि काहींना अटकही झाली आहे.

काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर टीका करताना ते म्हणाले, ‍₹काँग्रेस नेते सावरकरांचा अपमान करतात. राहुल गांधींना खुश करण्यासाठी ते बोलत आहेत. तर संजय राऊत यांच्याबाबत ते म्हणाले, एखाद्याला पंडू रोग झाला की तो काहीही बडबडतो. भाजप आणि मोदींचे नाव घेतले की त्यांना विस्मृती होते.

वक्फ बोडार्बाबत बावनकुळे म्हणाले, चुकीच्या नोंदी झाल्या आहेत, त्या दुरुस्त होतील. हिंदू, अल्पसंख्याक आणि देवस्थानांच्या जमिनी आहेत. सर्वेक्षणाचे अधिकार मिळतील आणि सर्व कायदेशीर होईल. अतिक्रमण आणि मोघलशाहीमुळे वक्फ बोर्डाची समस्या वाढली, ती दुरुस्त होईल. या पत्रकार परिषदेतून बावनकुळे यांनी सरकारच्या योजनांची माहिती देताना विरोधकांवरही जोरदार हल्ला चढवला. यामुळे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

# शिंदेसेनेकडून राज ठाकरेंना डिचवण्याचा प्रयत्न




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गंगा नदीच्या प्रदूषणावर गुढीपाडवा मेळाव्यातून केंद्र सरकारवर टीका केली होती. मात्र त्यांच्या त्या विधानावरून आता राजकारण होताना पाहायला मिळत आहे.

गंगाजल शुद्धच आहे पण काहींच्या विचारांचे काय? असा सवाल करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून राज ठाकरेंना डिवचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांनी हे बॅनर लावले आहे. महत्त्वाचे म्हणजे याच मतदारसंघातून राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी सदा सरवणकर यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते सदा सरवणकर यांनी समाधान सरवणकर यांच्या माध्यमातून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर कथितपणे बोचरी टीका करणाऱ्या एका बॅनरवरून मनसे चांगलीच संतप्त झाली आहे. या बॅनरला एकनाथ शिंदे यांची मान्यता आहे का? असा खडा सवाल मनसेने यासंबंधी उपस्थित केला आहे. तसेच हे बॅनर देखील काढून टाकले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या कुंभावरील वक्तव्याची शिवसेना शिंदे यांनी खिल्ली उडवली आहे. शिवसेनेचे युवा अधिकारी समाधान सरवणकर यांनी शिवसेना भवनासमोर एक मोठा होर्डिंग लावला असून, त्यावर 'गंगेचे पाणी शुद्ध आहे, पण तुमचे विचार शुद्ध आहेत का?' असा प्रश्न विचारला आहे. वास्तविक मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कुंभमेळ्यात गंगा नदीतील प्रदूषित पाण्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

हे पाणी शुद्ध समजून पिणाऱ्यांची एक प्रकारे राज ठाकरेंनी खिल्ली उडवली होती. आता दादर येथील शिवसेना शिंदे गटाचे नेते सदा सरवणकर यांच्या मुलाने या मुद्द्यावरून राज ठाकरेंना आव्हान दिले आहे.

दिव्य महाकुंभाचा ऐतिहासिक सोहळा! जगभरातील 60 कोटींहून अधिक हिंदू बांधवांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करून अखंड हिंदू एकात्मतेचा जागतिक संदेश दिला! हा क्षण अभिमानाचा, हा क्षण गौरवाचा, हा क्षण हिंद एकजुटीचा. गंगाजल शुद्धच आहे पण काहींच्या विचारांचे काय? असा सवाल या बॅनरमधून विचारण्यात आला आहे.

## सूस कचरा प्रकल्प बंद करण्याचा चंद्रकांत पाटलांचा इशारा

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ :** कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि मंत्री चंद्रकांतदादा पाटील हे गुरूवारी पुन्हा सूस घनकचरा प्रकल्पावरुन आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांची चांगलीच झाडाझडती घेत, आजच संबंधित प्रकल्प बंद न झाल्यास, उद्या सदर प्रकल्पाविरोधात खूर्ची टाकून आंदोलन करत बसण्याची वेळ येऊ देऊ नका, असा इशारा दिला.

सूस रस्त्यावरील ओल्या कचऱ्यापासून सीएनजी तयार करण्याचा प्रकल्प बंद करण्याची सातत्याने मागणी होत आहे. सदर प्रकल्प टप्प्याटप्प्याने बंद करुन नांदे-चांदे येथे स्थलांतरित करण्याचा निर्णय जानेवारी 2024 मध्ये झाला होता. त्याअनुषंगाने आमदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या निवासस्थानी मनपाचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांच्या सोबत गुरवारी बैठक झाली. या बैठकीत पाटील यांनी सदर प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला.

# अवकाळी पावसाने द्राक्ष उत्पादकांची चिंता वाढली



■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ३ :** द्राक्षाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या निफाड तालुक्यात गेल्या दोन ते तीन दिवसापासून बदललेल्या वातावरणामुळे 60 ते 80 रुपयांचा असलेला द्राक्षांचा प्रति किलोचा भाव कमी होऊन 45 ते 55 रुपये पर्यंत खाली आल्याने हातात ओंडाशी आलेल्या घास याबद्दल त्या हवामानाने हिसकावून घेण्याची भीती शेतकऱ्यांना धास्तावले आहे.

स्थानिक व्यापाऱ्यांबरोबर परप्रांतीय व्यापारीही या कार्यप्रणालीत समाविष्ट आहेत गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, कोलकाता व इतर खरेदीदार राज्यातील व्यापाऱ्यांची संख्या पाहून उत्पादकांचाही उत्साह वाढला. मात्र या उत्साहाला नजर लागली ती अनैसर्गिक वातावरणाची. सध्यस्थितीत ढगाळ वातावरण व रिमझिम पावसाने नेमके हेच वातावरण द्राक्ष बागांसाठी मारक असल्याचे उत्पादकांचे म्हणणे आहे.

भूरी, लालकोळी, पिंकबेरी याच्या प्रादुभार्वाची शक्यता वाढली आहे. द्राक्षामध्ये साखरभरणीस अटकाव, द्राक्षमण्यांचा रंग बदलणे, उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होणे अशा प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जावे लागण्याची चिन्हे दिसु लागल्याने उत्पादक हतबल झाले आहेत. अशा सर्व परिस्थितीमुळे उत्पादक कोंडीत सापडले आहेत. परिसरात रिमझिम स्वरूपाचा पाऊस पडल्यामुळे द्राक्षांना फटका बसला.

साधारणतः द्राक्ष ५ ते १५ दिवसांनी काढणीवर येणार असल्याने या ढगाळ वातावरणात त्याअगोदर जर पाऊस पडला तर संपूर्ण द्राक्ष बाग खराब होऊन द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. या सर्व रोखण्यासाठी द्राक्ष उत्पादकांना सकाळ संध्याकाळी महागडी औषध फवारणी करावी लागत आहे. द्राक्षबागांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो, परंतू केलेला खर्च भरुन निघत नसल्याने द्राक्ष उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

गेल्या वर्षभरापासून मेहनत घेत होता. दोनदा असा आलेला घास निसर्गचक्रामुळे हिसकावला जातो की काय याची भीती वाटत आहे, अशी चिंता द्राक्ष उत्पादक सूरज चौधरी यांनी व्यक्त केली.

**शेतकऱ्यांपुढे अनेक संकटे**

मागील वर्षी झालेल्या अवकाळी पावसाने शेतकरी पूर्व पदावर आलेला नसताना पुन्हा अवकाळीचे नवीन संकट उभे राहिले आहे. सततच्या हवामान बदलामुळे शेतकरी मेटाकुटीला आला असून शेतकऱ्यांपुढे कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे.

## २० वर्षांपासून लोणीच्या नाथ पालखी दिंडीचे मुस्लिम कुटुंबियाकडून स्वागत

■ **वृत्तसंस्था, लासलगाव, दि. ३ :** निफाड तालुक्यातील टाकळी विंचूर येथील मुस्लिम कुटुंबीय अहिल्यानगरमधील राहाता तालुक्यातील लोणी येथून आलेल्या ओम शिवपार्वती पायी पालखी दिंडी व भजन सेवा मंडळाच्या नवनाथ पालखीचे व या पायी दिंडीमध्ये सहभागी झालेल्या १२२ भाविकांसाठी अन्नदान व सेवा करून हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश दिला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील लोणी खुर्द येथील ओम शिवपार्वती पालखी दिंडी व भजनी मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष राजाराम सजेर्राव आहेर यांच्या अध्यक्षतेखाली २० वर्षांपासून लोणी खुर्द ते अंतापूर (दावल मल्लीकनाथ) अखंड नवनाथ रथ पालखी व पायी दिंडी सोहळा आणि रामनवमी वारी सुरू आहे.

या पालखीचे दिंडीचे सर्व नियोजन राजाराम आहेर बाबा बघतात. लोणी खुर्द ते अंतापूर (दावल मल्लीकनाथ) अखंड रथ पालखी व पायी दिंडीचे स्वागत निफाड तालुक्यातील टाकळी (विंचूर) येथील मुस्लिम कुटुंबियांकडून मागील २० वर्षांपासून केले जाते.

> संत तुकाराम महाराजांचे समकालीन असलेले महंमदखान महाराज हे मुस्लिम समाजातील वारकरी संप्रदायाचे संत होऊन गेले. त्यांच्या शिकवणीतून सृष्टीचा निर्माता एकच आहे या ठाम विश्वासातून महंमद महाराज हिंदू-मुस्लिम धार्मिक ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न त्या काळी करत होते. तसेच वारकरी संप्रदायामध्ये सुमारे ३० लहान-मोठे मुस्लिम संत होऊन गेले. त्यांच्या नंतर वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य आमच्या कुटुंबियांना मिळाले आहे. त्यामुळे आम्ही या पुढेही अशीच सेवा देण्याचा प्रयत्न करणार आहोत.
>
> **राजमहंमद शेख**
> **वारकरी सेवक, टाकळी विंचूर**



या दिंडीचा मुक्काम या मुस्लिम कुटुंबियांच्या घरी असतो. वारकऱ्यांच्या मुक्कामासह रात्रीच्या भोजनाची व सकाळच्या चहा-नास्त्याची सुविधा करण्यात येते. सेवा करताना मनात कोणताही दुजाभाव करीत नाहीत. मुस्लिम कुटुंबाने प्रेमाने आणि आदराने सेवा केल्याने दिंडीतील वारकरी भारावून गेले. तालुक्यातील टाकळी विंचूरमध्ये एकतेचा संदेश देणाऱ्या त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

महासागर अमरावती


शुक्रवार, दि. 4 एप्रिल 2025

पान 3

# घामाच्या धारा निघण्याच्या दिवसात कोसळताहेत पावसाच्या धारा

## मेळघाटात सोसाट्याच्या वाऱ्यासोबत अवकाळीची रिपरिप

### हिवसाळ्यानंतर उनसाळ्याचाही अनुभव



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )** – जेमतेम जिवाची लाहीलाही करणारा सुर्य तापायला लागला होता. कुलर, पंख्याशिवाय घामाच्या धारा थांबत नव्हत्या मात्र निसर्गाने अचानक कुस पालटली आणि घामाच्या धारा थांबून पावसाच्या धारा सुरु झाल्या. गेल्या हिवाळ्यात अवकाळी पावसाच्या आगमनाने नागरिकांनी हिवाळा आणि पावसाळा मिळून तयार झालेला 'हिवसाळा' ऋतु अनुभवला. आता नागरिक उन्हाळा आणि पावसाळा मिळून उनसाळा ऋतु चा अनुभव घेतातहेत. मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पावसाची रिपरिप सुरु असल्याने प्राणीमात्रांना उन्हाच्या दाहकतेपासून काही अंशी दिलासा मिळाला आहे.

हवामान खात्याने विदर्भात पावसाचा अंदाज व्यक्त केला होता.तो तंतोतंत खरा ठरला. विदर्भातील काही जिल्ह्यात तुरळक पाऊस झाला तर कुठे वादळी वाऱ्यामुळे शेतपिकाचे नुकसान झाले. मंगळवार नंतर बुधवारी रात्री व गुरुवारीही जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली. चिखलदरा तालुक्यात मात्र पावसाचा जोर अधिक पहायला मिळाला. तर इतर ठिकाणी दिवसभर ढगाळ वातावरण होते. मेळघाटातील अनेक वादळासह अनेक भागांत तुरळक सरी बरसल्या. यामुळे उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला. मात्र वादळामुळे आम्र कैऱ्यांचे नुकसान झाले. फुलोऱ्यावरील धानाला फटका बसण्याची शक्यता आहे. ढगाळ वातावरणामुळे धानासह भाजीपाला व इतर उन्हाळी पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या पावसाने कांदा, मुग, हळद पिकासह आंबा, निंबु या फळपिकांचे नुकसान झाल्याचे समजते.

### तापमानात लक्षणीय घट

पावसाच्या आगमनाने तापमानात लक्षणीय घट झाली आहे. हवामान खात्याकडून मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी अमरावती जिल्ह्यातील अधिकतम तापमान 34.4 तर न्युनतम तापमान 22.7 होते. तसेच अकोला जिल्ह्यातील अधिकतम तापमान 37.1 तर न्युनतम तापमान 22.5 होते. बुलढाणा जिल्ह्याचे अधिकतम तापमान 34.3 तर न्युनतम तापमान 20.0 होते. वाशिम जिल्ह्याचे अधिकतम तापमान 35.6 तर वाशिम जिल्ह्याचे अधिकतम तापमान 32.4 व न्युनतम तापमान 22.4 होते.

# हत्याप्रकरणातील आरोपीला आजन्म कारावास

## फ्रेजरपुरा हद्दीतील 2014 मधील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 3 )** – फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका हत्या प्रकरणात आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. ब्रिजेश उर्फ विजय मुलचंद गुप्ता (25 वर्ष, रा. महादेव खोरी, अमरावती) असे शिक्षा झालेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांच्या न्यायालयाने 3 एप्रिल रोजी हा महत्वपूर्ण निर्णय दिला.

पोलिस सुत्रानुसार, ऋषीकेश ठाकरे व गौरव इंगोले (दोन्ही रा. महादेव खोरी) हे दोघेही मित्र होते. या दोघांचे आरोपी ब्रिजेश गुप्ता सोबत वाद होता. घटनेच्या दिवशी 8 डिसेंबर 2014 रोजी सकाळी 1.30 वाजता ऋषीकेश ठाकरे व गौरव इंगोले हे हातात सायकल घेवुन पायी महादेव खोरी येथुन त्यांच्या घरी जात होते. त्यावेळी आरोपी ब्रिजेश गुप्ता व त्यांचा अल्पवयीन भाचा हे त्याच्या घरासमोर उभे होते. त्यांनी ऋषीकेश व गौरव याच्यासोबत वाद करून त्याला मारहाण करण्यास सुरवात केली. लगेचच ब्रिजेश हा धावत त्याच्या घरात गेला व लोखंडी तलवार घेवुन आला. त्यानंतर त्याने त्या तलवारीने गौरव इंगोलेंवर हल्ला केला, तो वार गौरवच्या डाव्या हाताच्या मनगटावर लागला आणि गौरव गंभीररीत्या जखमी झाला. या जखमेमुळे गौरव चक्कर येवुन तिथेच पडला. त्यानंतर लगेच ब्रिजेशने त्याच्या हातातील तलवारीने ऋषीकेशच्या मागे धावून जात त्याच्या छातीत तलवार मारून त्याची हत्या केली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टीफिकेटवरून फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात आरोपींविरुध्द भादंविच्या कलम 302, 307, 326, 504, 212, 201, 294, 34 प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहायक पोलिस निरीक्षक एन.डी. ओतारी यांनी पूर्ण करून आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. या प्रकरणात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी सतत सुनावणी घेवुन 3 एप्रिल रोजी सुनावणी पुर्ण केली. त्यामध्ये आरोपी ब्रिजेश उर्फ विजय मुलचंद गुप्ता (25 वर्ष, रा. महादेव खोरी, अमरावती) यांच्याविरुध्द सबळ पुरावा असल्याने गुन्हा सिध्द झाला. त्याला न्यायालयाने गुन्ह्यातील भादंविच्या कलम 302 नुसार आजीवन कारावास व 307 मध्ये 5 वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा, कलम 504 मध्ये 3 महिने सक्त मजुरी शिक्षा, तसेच 135 बी. पी. ॲक्टमध्ये 4 महिने सक्त मजुरी शिक्षा व 20 हजाराचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. नमुद प्रकरणात सरकारी पक्षातर्फे शासकीय अभियोक्ता सुनिल देशमुख यांनी युक्तीवाद केला.

### दोषसिध्दीसाठी यांचे महत्वाचे योगदान

या गुन्ह्यातील आरोपीविरूध्द पुरावा सिध्द करण्यासाठी पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सिएमसीच्या पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर, सहायक पोलिस निरीक्षक इम्रान नायकवडे, पैरवी अधिकारी म्हणून सहायक पोलिस उपनिरीक्षक बाबाराव मेश्राम, विनोद कनोजिया, महिला पोलिस हवालदार स्वाती बाजारे यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले व समन्वय केला.

# सात महिन्याच्या गर्भवतीवर लैंगिक अत्याचार

## आरोपीविरुध्द शिरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 3 )** सात महिन्याच्या गर्भवती महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना शिरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत 2 एप्रिल रोजी उघडकीस आली. पिडित महिलेच्या तक्रारीवरून शिरखेड पोलिसांनी आरोपी आकाश संजस बकाले (32, रा. मोर्शी तालुका) याच्याविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. पिडितेच्या तक्रारीनुसार, महिलेची दोन महिन्यापूर्वी आकाशसोबत इन्स्टाग्रामवर ओळख झाली. दरम्यानच ती महिला दुसर्यांदा गर्भवती झाली होती. अशातच 22 सप्टेंबर 2024 रोजी रात्री आकाश हा महिलेच्या घरी गेला आणि तिला म्हणाला की, या जगात माझे कोणीच नाही, तु माझ्यासोबत बोलत जा. असे म्हणून, त्याने सात महिन्याची गर्भवती असणार्या महिलेसोबत तिच्या इच्छेविरुध्द शारिरिक संबंध प्रस्थापीत केले. त्यानंतरही महिलेचा पती रात्रकालीन ड्युटीवर असताना, आकाश महिलेच्या इच्छेविरुध्द तिच्याशी शारिरिक संबंध प्रस्थापीत करीत होता. आकाश हा नेहमी महिलेशी शारिरिक संबंध प्रस्थापीत करून, महिलेला तिचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत होता. त्यामुळे आकाशच्या या त्रासाला कंटाळून अखेर महिलेने 2 एप्रिल रोजी शिरखेड पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी आकाशविरुध्द गुन्हा नोंदविला.

# कल्होडी शेत शिवारातून झटका मशिन लंपास

**अमरावती** – शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कल्होडी शेतशिवारातून सात हजार रुपये किमंतीची ईलेक्ट्रीक झटका मशिन चोराने लंपास केली. या घटनेची तक्रार सुभाष नारायण घुलक्षे (69, रा. सर्फापूर, ता. चांदुरबाजार, ह.मु.श्रीकृष्णनगरी, परतवाडा, ता.अचलपूर) यांनी 31 मार्च रोजी शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात दिली. या घटनेचा पुढिल तपास शिरजगांव पोलिस करीत आहे.

# भरधाव चारचाकीची दुचाकीला धडक, वृध्दाचा मृत्यू

## अमरावती – नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील घटना





**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, ( दि. 3 )** –भरधाव स्कार्पिओ वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने एका 78 वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. रामभाऊ शेषराव साबळे (78, रा.गुरुदेव नगर) असे मृताचे नाव आहे. ही घटना गुरूवारी (दि. 3) दुपारी दोन वाजताच्या दरम्यान मोझरी ते तिवसा राष्ट्रीय महामार्गावर घडला.

रामभाऊ साबळे हे आपल्या मोपेड क्रमांक एमएच 27 एबी 8827 ने गुरुदेवनगर येथून खाजगी कामानिमित्त तिवसा येथे जात होते. दरम्यान भरधाव असलेल्या स्कार्पिओ क्रमांक एमएच 27 डीएल 6262 ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीचालक रामभाऊ साबळे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हा अपघात इतका होता कि, दुचाकीचे दोन भाग झाले होते. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळ गाठले. रुग्णवाहिकेतून मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय तिवसा येथे दाखल करण्यात आला. पोलीसांनी पंचनामा केला असून चारचाकी वाहन चालक आर्यन उद्दीन कलंदार उद्दीन पठाण (वय 20, रा. जमील कॉलनी अमरावती) याच्या विरुद्ध बीएनएस कलम 281 ,106 नुसार गून्हा दाखला करण्यात आला आहे.

# युवा व्यापाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड ( दि. 3 )** – शेंदूरजनाघाट पोलिस स्टेशन हद्दीतील पुसला येथील एका व्यापार्याने कडुनिंबाच्या झाडाला ठिंबकच्या नळीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी (दि.2) दुपारी 12 वाजताच्या सुमारास घडली. आत्महत्या केलेल्या व्यापार्याचे नाव सचिन दामोधर खेरडे (35, रा. पुसला) असे आहे. पुसला येथील वरपेठ परिसरातील माता मंदिराजवळ राहत असलेल्या यशवंत ट्रेडरचे संचालक सचिन खेरडे यांचे गावातीलच बसस्थानकावर लोहा सिमेंटचे दुकान आहे. सचिनचे आई वडील, पत्नी, 6 वर्षाची मुलगी, 4 वर्षाचा मुलगा तसेच त्याचा लहान भाऊ सुरज खेरडे व त्याची पत्नी असा आप्त परिवार एकत्रित राहतो. सगळे काही सुरळीत सुरू असताना अचानक पंढरी प्रकल्पाजवळील एका झाडाला दुपारच्या सुमारास सचिनचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती गावात पसरताच कुंटबीयांसह गावकर्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेची माहिती शेंदुरजना घाट पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व सचिनचा मृतदेह खाली उतरून उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आला. वृत्त लिहेतोवर सचिनने आत्महत्या का केली असावी याबाबत कळू शकले नाही. पुढील तपास ठाणेदार दीपक महाडिक यांच्या मार्गदर्शनात संदीप वानखडे, सागर लेव्हरकर, विष्णू पवार करित आहे.

# काठीने बेदम मारहाण करून तरुणाची हत्या

## चांदुररेल्वे हद्दीतील मालखेड स्थित बारीपुरा येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुररेल्वे ( दि. 3 )** – काठीने बेदम मारहाण करून एका तरुणाची हत्या करण्यात आली. ही घटना चांदुररेल्वे ठाण्याच्या हद्दीतील मालखेड स्थित बारीपुरा परिसरात उघडकीस आली. अंबादास मारोती मानकर (32, रा. मालखेड, चांदुररेल्वे) असे मृताचे नाव आहे. या घटनेची तक्रार 2 एप्रिल रोजी जितेश जागो जीनेवारे (44, रा. मालखेडा, चांदुररेल्वे) यांनी चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी वर्षा संदेश मेश्राम (35) व नामदेव झोंगाजी मेश्राम (62, दोन्ही रा. बारीपुरा, मालखेड, ता. चांदुररेल्वे) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

जितेश जीनेवारे यांच्या तक्रारीनुसार, जितेश व अंबादास मानकर हे चांदुररेल्वे तालुक्यातील मालखेड येथे राहतात. दरम्यान जितेश माहिती पडले की, घराजवळील अंबादासचे वर्षा मेश्राम नामक महिलेसोबत वाद झाला आहे. त्यामुळे वर्षा मेश्राम व नामदेव मेश्राम यांनी अंबादासला काठीने बेदम मारहाण केली आहे. त्यामुळे जितेश जीनेवारे याने त्यांच्या घरी जाऊन पाहिले असता, अंबादासच्या चेहर्यावर मार लागल्याचे दिसले. त्यानंतर दुसर्या दिवशी सुध्दा जितेशने त्यांच्या घरी जाऊन पाहिले असता, अंबादास हा मरण पावल्याचे सांगण्यात आले. हा प्रकार पाहून जितेशने या घटनेची माहिती चांदुररेल्वे पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आणि अंबादासच्या मृतदेहाला शवविच्छेदनाकरिता चांदुररेल्वेतील शासकीय रुग्णालयात नेले. अंबादास याच्या शवविच्छेदन अहवाल पोलिसांना प्राप्त झाला असून, त्यामध्ये मारहाण केल्यामुळे अंबादासचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. तसेच याप्रकरणात पोलिसांनी जितेशचे बयाण नोंदविले. त्यानुसार आरोपींविरुध्द हत्येच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला.

# अपंगत्वावर मात करुन उदरनिर्वाहासाठी धडपड

## राधेश्याम सतवासे यांची 38 वर्षापासून नागरिकांची चरण सेवा



**दिनेश सोनोने**

**धारणी,( दि.3 )** – तालुक्यातील धुलघाट रेल्वे येथे रहिवासी राधेश्याम रतन सतवासे हे अनेकांकरिता प्रेरणादायी व्यक्ती ठरत आहेत, ज्यांनी आपल्या शारीरिक मर्यादांना कधीही आपल्या स्वप्नांसमोर अडथळा बनू दिला नाही. जन्मजात अपंगत्व असूनही ते गेली 38 वर्षे मोचीचे काम करत नागरिकांना चरण सेवा देत आहेत. आत्मनिर्भर जीवनाचे ते पक्के उदाहरण बनले आहे.

राधेश्याम सतवासे यांनी केवळ 9 व्या वर्षी मोचीचे (चांभार) काम सुरू केले, परंतु शिक्षण सोडले नाही आणि 10 वी पर्यंत शिक्षण घेतले. ते धारणी तालुक्यातील साप्ताहिक बाजारांमध्ये आपली छोटीशी दुकान लावतात. राणीगाव, सावलीखेडा, साद्राबाडी, सुसर्दा, कलमखार या गावांमध्ये आठवडी बाजारात ते चरण सेवा देण्याचे काम करतात. दिवसाला 300 ते 400 रुपये रोज ते

### मातृ-पितृछत्र हरविल्याने नशिबी संघर्ष

बालपणापासूनच संघर्षाला सामोरे जात राधेश्याम यांनी स्वत:ची जबाबदारी स्विकारली. कालांतराने त्यांच्या वडिलांचे निधन झाले आणि काही काळानंतर आईही या जगातून निघून गेल्या. त्यामूळे त्यांचा जीवन जगण्याचा संघर्ष आणखीनच वाढला. सध्या ते आपल्या लहान भावाच्या कुटूंबासमवेत धुलघाट रेल्वे येथे राहतात.

### शासकीय योजना नावालाच

सन 2018 मध्ये राधेश्याम यांना 45 टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळाले, मात्र या प्रमाणपत्रावर त्यांना केवळ 1500 रुपये रोजगार भत्ता मिळतो. त्यांना घरकुल योजना किंवा इतर कोणत्याही शासकीय मदतीचा लाभ मिळालेला नाही. त्यांच्या नावाने रेशन कार्ड असले तरीही पक्क्या घराचे स्वप्न आजही अपूर्ण आहे. त्यांच्या आईला मिळालेल्या घरकुलात ते आपल्या लहान भावाच्या कुटूंबासमवेत राहतात.

### विशेष वाहन योजनेची गरज

धुलघाट रेल्वे, धारणी तालुक्यापासून 70 किमी अंतरावर आहे. प्रत्येक आठवड्यात धारणीच्या आठवडी बाजारात पोहोचण्यासाठी त्यांना वाहनाची सोय नसल्यामुळे अनेकदा इतरांकडून मदत घ्यावी लागते. जर त्यांना अपंगांसाठी विशेष वाहन योजनेचा लाभ मिळाला, तर त्यांचे जीवन अधिक सुलभ होईल आणि ते अधिक आत्मनिर्भर होऊ शकतील.

### समाजसेवकांनी घ्यावा पुढाकार

राधेश्याम सतवासे यांसारख्या मेहनती आणि संघर्षशील लोकांना शासकीय योजनांचा योग्य लाभ मिळायला हवा. प्रशासनाने त्यांच्या गरजांकडे लक्ष द्यावे, जेणेकरून ते सन्मानपूर्वक आणि आत्मनिर्भर जीवन जगू शकतील. समाजातील लोकांनीही पुढे येऊन त्यांना मदत करावी, जेणेकरून त्यांच्या जीवनाला थोडेसे सुख आणि स्थैर्य मिळू शकेल. असे आवाहन त्यांच्या हितचिंतकांनी केले आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, अमरावती**

e-mail ID :- eemjpdivamt@gmail.com Ph. No.0721-2550538

**निविदा सुचना क्र. 02 सन 2025-26**

कामाचे नांव : – अमरावती / चिखलदरा / 105 / 79 गांवे पाणी पुरवठा योजना (देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत एकुण 14 कामाची निविदा मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांचे कडून बी– 1 पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सदर कामा करीता कंत्राटदारांनी कोरी निविदा मिळण्यासाठी अर्ज करावयाच्या दि. 07/04/2025 दि. 15/04/2025 पर्यंत राहील व कोरी निविदा विक्री कालावधी दि. 07/04/2025 पासुन दि. 16/04/2025 पर्यंत राहील. तसेच सिलबंद निविदा सादर करण्याचा दि. 17/04/2025 आहे.

सदर प्रकारची कामे केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सविस्तर निविदेसूचनेत नमुद केल्यानुसार सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा कोरी निविदा फॉर्म दिल्या जाणार नाही.

सविस्तर निविदा सुचना पुर्व अर्हताच्या अटी सहीत विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर पहावयास मिळेल.

( विवेक सोळंके )

वि.मा.का./अम./जाहि./5/2024-2025 कार्यकारी अभियंता

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# आता अपार्टमेंटलाही मिळणार नोंदणीकृत संस्थेचा दर्जा

**आत्तापर्यंत कोणतीही सुविधा नव्हती | एकाच व्यक्तीला द्यावी लागत होती देखभालची जबाबदारी | म्हाडाकडून बिल्डरांना घ्यावा लागेल तरतुदीचा आधार**



### महापालिकेला पत्र दिले

शासनाच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या कलम 9 नुसार संस्थेची नोंदणी करणे शक्य आहे. यासंबंधीचे पत्र महापालिकेच्या उपअभियंता यांना पाठवून सदनिकाधारकांना सोसायटीची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

**शंकर कुंभार,**
**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था.**

### हाऊसिंग सोसायट्यांमध्ये पूर्वीपासूनच सुविधा

ज्या फ्लॅट स्कीममध्ये गृहनिर्माण संस्था उभारून बांधकाम करण्यात आले आहे, त्यामध्ये सोसायटी स्थापन करण्याची सुविधा पूर्वीपासून उपलब्ध होती. पण आजकाल बिल्डर किंवा स्थानिक स्वायत्त संस्था जमीन विकत घेतात आणि तिथे फ्लॅट स्कीम बांधतात आणि नंतर वेगवेगळ्या लोकांना फ्लॅट विकतात. त्यामुळे त्या अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या लोकांची सोसायटी स्थापन करण्याचा प्रश्न निर्माण झाला. अशा परिस्थितीत आता म्हाडापासून ते खासगी बांधकाम व्यावसायिकांपर्यंत सर्वांनाच नव्या तरतुदींचा आधार घ्यावा लागणार आहे.

### पीएमवाय फ्लॅटधारकांनाही देण्यात येत आहे पत्र

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत शहरात बांधण्यात आलेल्या इमारतींनाही या प्रक्रियेतून जावे लागणार आहे. त्यासाठी विद्यापीठाजवळील इंदाळा, बडनेरा रोडवरील निंभोरा आणि बडनेरा जुनी बस्ती येथील साहिल लॉन या इमारतींमध्ये राहणाऱ्या सदनिकाधारकांना पत्रे देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेचा प्रभारी उपअभियंता यांच्यामार्फत ही कारवाई करण्यात येत आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.3) –** अमरावती शहरात गेल्या काही वर्षांत बांधण्यात आलेल्या उच्चभ्रू इमारतींच्या फ्लॅट स्कीममध्ये राहणाऱ्या नागरिकांना आता मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी अशा इमारतींमध्ये राहणाऱ्या लोकांकडून देखभालीची रक्कम वसूल करण्याची जबाबदारी एकाच सदनिकाधारकाला घ्यावी लागत होती. मात्र आता अपार्टमेंटमध्ये राहणारे सर्व फ्लॅटधारक नियमानुसार संस्था म्हणजेच सोसायटी स्थापन करू शकतील. अशा संस्थेची नोंदणी सहकार विभागाकडे करता येते. त्यासाठी जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांनी महापालिका प्रशासनाला पत्रही दिले आहे.

म्हाडा, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि गृहनिर्माण योजना राबविणारी कार्यालये यांसह खाजगी बिल्डर्सच्या माध्यमातून शहरात 7 हजारांहून अधिक अपार्टमेंट्स म्हणजेच निवासी संकुले बांधली जात असून काही तयारही आहेत. एका अपार्टमेंटमध्ये सरासरी 30 फ्लॅट्सचा विचार केल्यास हा आकडा 21 हजारांच्या आसपास पोहोचतो. तसेच, प्रत्येक कुटुंबात किमान 4 सदस्य असल्याने अंदाजे 8 लाख 40 हजार नागरिक शहरात असलेल्या विविध सदनिकांच्या फ्लॅट स्कीममध्ये राहतात. या कायदेशीर तरतुदीमुळे आता या सर्वांना दिलासा मिळणार आहे. कारण आता प्रत्येक फ्लॅट स्कीममध्ये सोसायटी स्थापन करून त्याची नोंदणी करणे शक्य झाले आहे. फ्लॅटमधील पाणीपुरवठा, पोर्च आणि इमारतीभोवती दिवाबत्ती आणि इतर विविध खर्चाची बिले तेथे राहणाऱ्या नागरिकांना भरावी लागतात. ज्यासाठी सर्व सदनिकाधारक देखभाल म्हणून दरमहा एक निर्धारित रक्कम वसूल केली जाते. ही वसुली नियमानुसार होण्यासाठी सदनिका योजनेत राहणाऱ्या नागरिकांची सोसायटी असणे आवश्यक आहे. मात्र आजपर्यंत अशा सोसायटीची नोंदणी करण्याची सोय नव्हती. त्यामुळे जवळपास सर्वच फ्लॅट स्कीममध्ये ही जबाबदारी सर्वांचा विश्वास असलेल्या एका व्यक्तीला घ्यावी लागत होती. ही अडचण लक्षात घेऊन जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने याबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागविले होते. त्यामुळे आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या कलम 9 मध्ये याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या पत्राचा संदर्भामुळे महापालिका प्रशासनानेही तातडीने पुढाकार घेत ही माहिती शहरात असलेल्या अपार्टमेंटपर्यंत पोहोचविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अशा स्थितीत, आता सर्व अपार्टमेंटमधील सार्वजनिक सुविधांवर होणारा खर्च म्हणजेच पाणीपुरवठा, वीज वापर आणि इतर किरकोळ दुरुस्तीची कामे नोंदणीकृत संस्थेमार्फत केली जाऊ शकतात. सदनिकेतील पाणी आणि वीज वापराची बिले सदनिकाधारकाद्वारे भरली जातात. ज्यासाठी संबंधित फ्लॅटधारक अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या सर्व फ्लॅटधारकां कडून रक्कम गोळा करतो. त्यामुळे अनेकवेळा अविश्वासाची व वादाची परिस्थिती निर्माण होऊन बिल उशिरा दिल्याने अनेकवेळा दंडाचा नाहक बोजा सर्वांना सहन करावा लागतो. मात्र आता ही सर्व कामे नोंदणीकृत सोसायट्यांच्या माध्यमातून करता येणार आहेत. त्यामुळे सर्व

# सेवानिवृत्त पोलिसांचा सत्कार



**पोलीस आयुक्तालयात आयोजन**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती –** शहर पोलिस आयुक्तालय आस्थापनेवरील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले पोलिस उपनिरीक्षक यज्ञेश्वर अंबुलकर व सहायक पोलिस उपनिरीक्षक राजु पाचंगे यांचा निरोप समारंभ कार्यक्रम 1 एप्रिल रोजी पोलीस आयुक्त कार्यालयातील मिटिंग हॉल येथे पार पडला. यावेळी पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांच्या हस्ते पोलीस महासंचालक यांचे शुभेच्छापत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, सेवानिवृत्ती प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला, तसेच सेवानिवृत्त अंमलदार यांच्या पत्नीस साडी व कुंडीतील रोपटे देवुन कौटुंबिक वातावरणात सत्कार करण्यात आला.

सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांना पुढील भविष्यात सुदृढ आरोग्याकरीता कुटुंब प्रमुख या नात्याने पोलीस आयुक्त यांनी शुभेच्छा देवुन सेवानिवृत्ती काळात शासकीय सुविधेबाबत काही अडचणी असल्यास संपर्क करण्याबाबत सुचीत केले. सदर कार्यक्रमाकरिता पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे, पोलीस कल्याण शाखेचे पोलीस निरीक्षक संजय अढाऊ, प्रशासकिय अधिकारी किशोर शेंडे, कार्यालय अधिक्षक आरती आठवले तसेच सेवानिवृत्त झालेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कुटुंबीय तसेच अधिकारी व अंमलदार हजर होते.

# आष्टी जवळ कचऱ्यात आढळला अज्ञात मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3) –** परतवाडा महामार्गावर आष्टी गावाजवळ रस्त्याच्या बाजूने कचर्याच्या ढिगार्यात एक बेवारस मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. बेवारस प्रेत मिळाल्याने घातपाताची शंका व्यक्त करण्यात येत आहे.

सोमवारी (दि.1) दुपारच्या सुमारास गावकरी या बाजूने जात असता मृतदेह आढळून आला. काही जणांनी या बाबत पोलिसांना माहिती दिली.वलगांव पोलिसांचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला. मृतकाचे शरीर कुजलेल्या अवस्थेत होते. चेहर्यावर देखील जखमा झाल्या होत्या. त्याच प्रमाणे मृतदेहाला वास सुटला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी आजू बाजूला लोकांना विचारपूस केली. मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी फोटो सर्व पोलीस ठाण्यात पाठवले आहे. मृतकाचा चेहरा पूर्ण काळा पडलेला आहे. त्यामुळे घातपाताची शंका वर्तवण्यात येत आहे. उष्माघाताचा बळी देखील असावा,असा अंदाज देखील व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी तूर्तास आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. मृतदेहाची ओळख पटल्यानंतर आणि शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त झाल्या नंतर पोलीस कोणत्या निष्कर्षा पर्यंत पोहोचतात,हे पहाणे महत्वाचे आहे.

# वेतन, निवृत्तिवेतन एक तारखेला द्या!

**जि.प. च्या शिक्षकांचे एकदिवसीय धरणे**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3) –** जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी वेतन व निवृत्तिवेतन व इतर आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी चेतवा कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वात जि.प.च्या शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षकांनी जिल्हा परिषद मुख्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन केले. आपल्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. चेतवा कर्मचारी संघटनेने आंदोलनादरम्यान जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षकांच्या आर्थिक बाबी निकाली काढण्यासाठी दोन स्वतंत्र लिपिकांची व्यवस्था करण्यात यावी. जेणेकरून सर्व शिक्षकांचे वेतन व निवृत्ती वेतन विषयक बाबी लवकरात लवकर निकाली काढण्यात येतील. तसेच सर्व शिक्षकांना सेवा निवृत्तीच्या दिवशी त्यांचे लाभ मिळावेत, असे म्हटले आहे. याशिवाय जि.प.प्राथमिक शिक्षकांची प्रलंबित वैद्यकीय व इतर बिलेही लवकरात लवकर अदा करण्यात यावीत. या एकदिवसीय आंदोलनात चेतवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सत्येंद्र अभ्यंकर यांच्यासह शोभा मेहरे, रेखा कुंदेकर, हरिदास ठाकरे, रेखा गवळी, प्रकाश राक्षे, कविराज जाधव, सुरेंद्र वाडेकर, अशोक पवार, सुषमा भागवत, रेखा शिरभाते, मीरा गुल्हाणे, राजकुमार पाटील, दुकळे पाटील, एस. विजया देशवत, ज्ञानेश्वर राऊत, इंदुमती ढवळे, हर्षा बांबळ, चंद्रकला मनोहर, रेहाना परवीन, गंगा उमप, गजानन बडवाईक, सविता चर्जन, शील उल्हे, विनोद दळवी, मनोहर फाले, उत्तम अंबडकर, अरुणा वैद्य, उषा रणगे, उषा चकरा, मीरा चकरा, उ. प्रेमदास गेठे, हनिफ हबीब, गजानन गावंडे, गजानन पाथरे, चंद्रप्रभा गुल्हाने, मंजुषा राऊत, सलमाबानो रंगारी, केशव पाटील, सय्यद मजाज सय्यद तैमूर, शालिनी नागपुरे, हेमलता लायदे, प्रमोद डहाणे, कल्पना जांभळे, मेघा वहाणे, सुधा चंगे, मेघा वाहणे, सुधा चंगेरे, सून दांडे, स. राजू बोंडे, प्रमोद दवंगे, सुनील उगले, रमेश झाकडे आदींसह जिल्ह्यातील जि.प.मधील शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# विद्युत डीपीला आग, सुदैवाने जीवितहानी टळली




**महासागर प्रतिनिधी**

**धारणी (दि. 3) –** उन्हाळ्याच्या दिवसात आग लागण्याचे प्रमाण वाढले आहे. दरम्यान शहरातील दयाराम चौकात मंगळवारी (दि.1)सकाळी अचानक विद्युत डीपीला आग लागल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली.आगीचा भडका इतका तीव्र होता की काही वेळासाठी संपूर्ण चौकात भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या आगीत कुठलीही जीवित हानी झाली नाही. विद्युत डीपीला अचानक आग लागल्याने आगीच्या ज्वाळा आणि धूर पसरला.परिसरातील नागरिक आणि दुकानदार घाबरून पळू लागले. या ठिकाणी कपड्याची आणि भांड्याची अनेक दुकाने आहेत. त्यांनी तत्काळ आपली दुकाने बंद केले. सुदैवाने आगीचा मोठा फटका कुठल्याही दुकानाला बसला नाही.शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये विद्युत डीपी जवळ अतिक्रमण झाल्याचे दिसून आले.या घटनेमुळे प्रशासनाच्या कार्यशैलीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.नागरिकांनी, व्यापार्यांनी प्रशासनाला वारंवार विद्युत डीपीच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याची मागणी करूनही कुठली ही ठोस कारवाई झाली नाही.या आगीमुळे पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले की, शहरातील वीज व्यवस्थापन सुधारण्याची तातडीने गरज आहे. अनेक ठिकाणी अनधिकृत वीज कनेक्शन, खराब डीपी आणि अतिक्रमणामुळे अपघात होण्याचा धोका वाढला आहे. महावितरणचे आगीत मोठे नुकसान झाले आहे. भविष्यात आणखी मोठी दुर्घटना निष्काळजीपणामुळे घडू शकते.त्यामुळे वेळीच प्रशासनाने खबरदारी घेणे आवश्यक आहे.

# आष्टी ते टाकरखेडा मार्गाच्या दुरुस्तीवर दरवर्षी लाखोंचा खर्च

**रस्त्याची हालत मात्र जैसी-थे च**



**महासागर प्रतिनिधी**

**टाकरखेडा संभू, (दि. 3)** –आष्टी ते टाकरखेडा संभू मार्गाच्या दुरुस्तीवर दरवर्षी लाखोंचा खर्च केल्या जातो. मात्र रस्त्याची हालत जैसे थेच दिसत आहे. या मार्गावर नव्याने रस्ता बांधण्याची गरज असताना याकडे मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष दिसून येत आहे. परिणामता नागरीकांमध्ये रोष वाढत असून रस्ता दुरस्तीला मुहुर्त केव्हा, असा प्रश्न नागरीकांकडून उपस्थित केल्या जात आहे.

भातकुली तालुक्यातील आष्टी ते टाकरखेडा संभू हा 24 तास वर्दळीचा मार्ग आहे. गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून या मार्गाची दुरावस्था झाली आहे.साऊर, रामा, तळवेल, कृष्णापुर, लसनापुर व चांदूरबाजार मार्गावरील वाहनांची या मार्गावरुन वर्दळ असते. दरवर्षी या मार्गावर दुरुस्तीकरिता लाखोंचा खर्च करुन प्रशासन मोकळे होते. पुन्हा दुसर्या वर्षी रस्त्याची जैसे थे हालत होते. या मार्गावर नव्याने रस्ता बांधण्याची गरज आहे.त्यामुळे याकरिता उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी कित्येकदा पाठपुरावा करुन आंदोलन देखील केले होते. त्यानंतरही याची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे आता पालकमंत्री याकडे लक्ष देतील का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# मेळघाटातील भूजल स्तर खालावला

**आदिवासी बांधवांची पिण्याच्या पाण्यासाठी फरपट | विजेच्या लपंडावमुळे अनेक गावात पाण्याची टंचाई**



### कोसो दुर पाण्यासाठी पायपीट

सध्या अनेक आदिवासी गावातील नागरिक पाण्याअभावी तहानलेलेच असून जमिनीत पाणी नसल्यामुळे कोसो दुर पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. विहिर आणि बोरवेलचे स्रोत आटल्यामुळे आणि त्यात विजेच्या लपंडावमुळे बिजूधावडी, बारू, खार्या या सारख्या शंभरहून अधिक नदीकाठच्या गावांत पाण्याची भीषण टंचाई जाणवत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आदिवासी भागात न भुतो न भविष्य अशी पाणी टंचाईचे सावट कोसळणार असल्याची चिन्हे दिसत आहे.



जमिनीतील पाण्याची पातळी खोल गेल्यामुळे आणि कमी विजेच्या दाबामुळे पाणी पुरवठा योजना दम तोडत आहेत. खार्या गावांत ग्राम पंचायतीकडून ट्रक्टरने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

**संतोष बैस,**
**खाऱ्या ता. धारणी**

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी, (दि. 3) –** मेळघाटातील पहाडातील पाण्याची पातळी अतिशय खोल गेल्यामुळे आणि विजेच्या लपंडावमुळे अनेक गावात पाण्याची अभुतपुर्व टंचाई निर्माण झाली आहे. महिला डोक्यावर घागरी घेऊन वनवन भटकत असल्याचे विदारक चित्र सध्या पहायला मिळत आहे.

यंदा जंगलातील नदीनाले वेळेपुर्वीच आटल्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वेगाने कमी होत आहे. तलाव व मोठ्या सिंचन प्रकल्पातील पाणी झपाट्याने कमी होत असुन विहिरी, बोरवेल मधूनही पाण्याचा उपसा होत नसल्यामुळे थेंब भर पाण्यासाठी डोक्यावर घागरी घेऊन महिला जंगलात भटकतांना दिसत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मेळघाटातील डोंगरदऱ्यात जलसंधारणाची कामे निधीअभावी बंद पडलेली आहे. येथे जिल्हा परिषद सिंचन विभाग आणि कृषी विभागाकडून जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेतली जात होती. ही कामे पाणी टंचाईचे संकट दुर करण्यासाठी महत्वपूर्ण ठरलेली होती. पहाडावर जमिनीत चर खोदून पाणी जमिनीत मुरवले जात होते. या कामातुन पहाडाला पाझर फुटत होती. गेल्या तीन चार वर्षापासून सरकारने जलसंधारणाची कामे करून या भागात हरितक्रांती घडविणाऱ्या वरील तिनही खात्यांना निधी न देता एक जलसंधारण विभागाचे नवीन उपविभागीय कार्यालय उघडून त्या खात्यावर निधी टाकण्यात आल्यामुळे जलसंधारणाची कामे राबविण्यार्या स्थानिक विभागावर शासनाने अविश्वास दाखविला आहे.

# माहुली जहागीर येथे पाणपोईचे उद्घाटन

**स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 3) –** प्रवाशांना तसेच पादचाऱ्यांना थंड व शुद्ध पाणी मिळावे, यासाठी स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने माहुली जहागीर बस स्टँड येथे मंगळवारी पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. राजेश वानखडे यांच्या हस्ते पार पडले.

सामाजिक, क्रीडा, कला, सांस्कृतिक जडणघडणमध्ये महत्वाचे योगदान असणाऱ्या स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दरवर्षी उन्हाळ्याच्या दिवसात पाणपोईची सुविधा करण्यात येते. ट्रस्टचे अध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या माध्यमातून प्रवासी व पादचारी यांच्याकरिता शुद्ध आणि थंड पाण्याची निशुल्क व्यवस्था करण्यात येते. उन्हाळा सुरु होताच नित्यनेमाने माहुली जहागीर बसस्टॅन्ड वर ही व्यवस्था करण्यात येते.आ.राजेश वानखडे यांच्या हस्ते या पाणपोईचे उदघाटन करून या जलसेवेला प्रारंभ करण्यात आला. गावातील ग्रामस्थ आणि प्रवाशांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार असून, उन्हाच्या दिवसात पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी सांगितले. माहुली जहागीर ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यात असेच सामाजिक उपक्रम राबविण्याची मागणी केली. या प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष विवेक गुल्हाने, ग्रामपंचायत सदस्य हारुन भाई, माजी पंचायत समिती सदस्य वीरेंद्र लंगडे, तसेच बाळासाहेब पाचघरे, मनोज यावले, नितिन काळे, प्रविण वनवे, अक्षय ठाकरे, आकाश गुल्हाने, अनिल खंडारे, तेजस वानखडे आणि भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# गजकर्ण होत आहे फ्लायओव्हरचा मुद्दा

## लोकप्रतिनिधींना अनेक निवेदने मात्र परिस्थिती जैसे थे







**सलील काळे**

**धामणगाव रेल्वे, ( दि.3 )-** अशी मान्यता आहे, एकदा तळहात खाजविला तर पैसे येतात, दोनदा तळहात खाजविला तर भरपूर पैसे येतात, मात्र पुन्हापुन्हा हात खाजवित असेल तर ते गजकर्ण असू शकते रिस्क न घेता डॉक्टरकडे जावे. धामणगाव रेल्वेच्या फ्लायओव्हरचा मुद्दा येथील नागरिकांकरिता गजकर्णासारखा ठरत आहे. येथील लोकप्रतिनिधींना अनेक निवेदने देवूनही मात्र परिस्थिती 'जैसे थे' आहे.

येथील सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की रेल्वे कल्याण निधी च्या माध्यमातून हा फ्लायओव्हर चा प्रकल्प पूर्ण करावा. वर्धा लोकसभा मतदार संघाचे खासदार आणि धामणगाव रेल्वे मतदार संघातील आमदारांकडे अनेक वेळा निवेदने देऊन, गाऱ्हाणे मांडण्यात आले. मात्र यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. नगरपालिका प्रशासनाने देखील हा विषय रेल्वे विभाग आणि राज्य सरकार यांच्याकडे ढकलला आहे. भारतीय रेल्वे कायदा, 1989 हा कायदा रेल्वे कार्यपद्धतीसाठी मार्गदर्शक असून रेल्वेच्या पायाभूत सुविधांमुळे नागरिकांचे नुकसान झाल्यास भरपाई मिळवण्यासाठी मदत करू शकतो. रेल्वे दाव्यांचा लवाद रेल्वे प्रकल्पांमुळे बाधीत झालेल्या नुकसानीची भरपाई मिळवण्यासाठी हा लवाद नागरिकांना मदत करू शकतो. जमीन अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्स्थापन कायदा, 2013 जर फ्लायओव्हर प्रकल्पामुळे कोणाचे विस्थापन झाले, तर त्यांना बाजारभावानुसार तसेच कायद्यात असलेल्या तरतुदीनुसार नुकसान भरपाई देण्याची तरतूद या कायद्यात आहे. रेल्वे कल्याण निधी हा निधी रेल्वे कर्मचारी आणि स्थानिक समाजासाठी वापरण्यात येतो. याचा उपयोग धामणगावच्या वाहतूक समस्येवर उपाय शोधण्यासाठी होऊ शकतो.

### यवतमाळ जिल्ह्यावर ही परिणाम

धामणगाव रेल्वे स्थानक हे फक्त स्थानिकांसाठीच नव्हे, तर यवतमाळ जिल्ह्यासाठीही महत्त्वाचे आहे. यवतमाळ जिल्ह्याचे मध्य रेल्वेवरील प्रवेशद्वार अशी धामणगाव रेल्वे स्थानकाची महाराष्ट्रभर ओळख आहे. त्यामुळे तेथील व्यापारी आणि प्रवासी पूर्णपणे धामणगाव स्थानकावर अवलंबून आहेत. कापूस, सोयाबीन, खते, बियाणे आणि कोळसा यांच्या मालवाहतूकीचा व्यवसाय येथे होतो. वाहतूक सुलभ झाली तरच त्याचा प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

### राजकीय दुर्लक्ष आणि वाढता जनक्षोभ

स्थानिक नेते तसेच आमदार, खासदार यांच्यावर ओव्हरब्रिज सारख्या कळीच्या मुद्द्यावर दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी जबाबदारी झटकत म्हटले की, 'रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्र सरकारच्या एजन्सींसोबत समन्वय आवश्यक आहे.' यामुळे नागरिकांत तीव्र संताप उसळला असून आंदोलन आणि सोशल मीडिया मोहीम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त आहे . 'जर आमच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर आम्ही थेट दिल्लीपर्यंत लढा उभा करू,' अशा भावना अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. धामणगावचा हा संघर्ष जुनी पायाभूत सुविधा आणि आधुनिक नागरी गरजा यांच्यातील संघर्ष दर्शवतो. भारतीय रेल्वेला दरवर्षी कोट्यवधी रुपयांची कमाई धामणगाव रेल्वेस्टेशनच्या माध्यमातून मिळत असताना, सुध्दा जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न ठरलेल्या स्थानिक समस्येकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे का? धामणगावकर सदर मुद्द्यावर प्रतिकार करू लागले आहेत. हा लढा फक्त वाहतुकीसाठी नसून, तो शहराच्या सर्वांगीण उन्नतीसाठी, आर्थिक भरभराटीसाठी आणि उज्वल भविष्यासाठी देखील गरजेचे आहे, हे सत्य स्विकारावेच लागेल.

# यशवंत पंचायतराज अभियानात तिवसा पंचायत समिती विभागात प्रथम



**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा ( दि. 3 ) -** यशवंत पंचायतराज अभियान सन 2024-25 अंतर्गत अमरावती विभागाचा निकाल विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती व्दारे जाहीर झाला आहे. त्यानुसार विभागातील 56 पंचायत समित्यांपैकी तिवसा पंचायत समिती ला प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. त्यामुळे पंचायत समिती तिवसा 11 लाख रुपयाचे बक्षीसाकरीता पात्र ठरली आहे. महाराष्ट्र शासनाव्दारे दरवर्षी यशवंत पंचायतराज अभियान बक्षीस योजना राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदेकरीता राबविण्यात येत असते. स्पर्धेतील सर्वोत्तम पंचायत समितीच्या निवडीकरीता विभागस्तरीय मुल्यमापन समितीव्दारे पंचायत समिती, तिवसा च्या कामकाजाची तपासणी करण्यात आली होती. पंचायत समिती, तिवसा अंतर्गत सामान्य प्रशासन विभाग, महिला बालकल्याण विभाग, आरोग्य , कृषि , पाणी पुरवठा , मनरेगा , शिक्षण , वित्त, पशुसंवर्धन, समाज कल्याण,पंचायत , परिषद विभागाद्वारे राबविण्यात आलेल्या योजनांची तपासणी विभागस्तरीय मुल्यमापन समितीने केली. पंचायत समितीने केलेल्या कामगीरीप्रमाणे विभागस्तरीय मुल्यमापन समितीने केलेल्या गुणदाणानुसार विभागातील पाचही जिल्हयातील एकुण 56 पंचायत समित्यांपैकी पंचायत समिती तिवसा ला सर्वाधिक गुण मिळाल्याने अमरावती विभागात तिवसा पंस प्रथम क्रमांकाकरीता पात्र ठरली.

अमरावती विभागातुन पंचायत समिती, तिवसा प्रथम आली असल्याने विभागस्तरावरील 11 लाख रुपयाचे बक्षीस मिळणार आहे. त्यापुढील राज्यस्तरीय स्पर्धेकरीता पात्र असुन त्यासाठी राज्यस्तरावरील मुल्यमापण समितीव्दारे पंचायत समिती, तिवसा ची तपासणी लवकरच होणार आहे.

### पंचायत समितीत आनंदोत्सव-

पंचायत समिती, तिवसा विभागस्तरावरील प्रथम क्रमांकाचे 11 लाख रुपयाचे बक्षीसाकरीता प्राप्त झाल्याने पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अभिषेक कासोदे व सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी पंचायत समिती, तिवसा सभागृहात दि. 1 एप्रिल रोजी आनंदोत्सव साजरा करण्यात आला.गट विकास अधिकारी यांनी राज्यस्तरीय स्पर्धेकरीता यापेक्षा जास्त जोमाने काम करण्याचे आवाहन पंचायत समिती, तिवसा चे अधिकारी कर्मचारी यांना केले. या कामगिरीसाठी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) बाळासाहेब बायस, माजी सभापती कल्पना दिवे, तसेच पंचायत समितीचे सर्व माजी पदाधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले.

# जिल्हा परिषदेतील अनेकांसाठी गुरुवार ठरला सोनियाचा दिनु

## 115 मुख्याध्यापक, 21 विस्तार अधिकारी तर 25 जणांची केंद्र प्रमुख पदी वर्णी

## रखडलेल्या बहुतांश पदोन्नत्या निघाल्या निकाली



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )-** अमरावती जिल्हा परिषदेत आजचा दिवस अनेक अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांकरिता सोनियाचा दिवस ठरला. गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या पदोन्नत्या जिल्हा परिषद मुख्य कार्यपालन अधिकारी संजिता महापात्रा यांनी निकाली काढल्या. त्यामूळे आज एकाच दिवशी 21 जणांची विस्तार अधिकारी पदी, 25 जणांची केंद्र प्रमुख पदी तर 115 शिक्षकांची मुख्याध्यापक पदी वर्णी लागली.

यामध्ये विस्तार अधिकारी वर्ग 3 श्रेणी दोन 6 पदे, विस्तार अधिकारी वर्ग श्रेणी 3 ची 4 पदे, केंद्रप्रमुख 23 पदे, उच्च श्रेणी मुख्याध्यापक मराठी 120 पदे, उर्दू 20, तसेच माध्यमिक शिक्षक उच्च श्रेणी या सर्व पदोन्नत्या आज करण्यात आल्यात.

या निर्णयाबद्दल अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघातर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, शिक्षणाधिकारी प्राथमिक अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनवणे, विस्तार अधिकारी मोहने या सर्व पदोन्नतीसाठी राबणारी शिक्षण विभागाची चमू विशेषत: मालोकर, काळमेघ, ऋषिकेश कोकाटे, बिलबिले, अधीक्षक प्रविण जिसकार व प्रशासन अधिकारी मुंद्रे या सर्वांचे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे किरण पाटील, गजानन चौधरी, सुभाष सहारे, संजय साखरे, अशोक चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे

> प्राथमिक शिक्षकांसाठी आजचा दिवस हा सुवर्णाक्षरांनी नोंदवण्यासारखा आहे. जिल्हा परिषद सेवेतील प्राथमिक शिक्षकांना मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या पदोन्नत्या आज एकाच दिवशी करण्यात आले आहे, अशी अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ मागील एक वर्षापासून या पदोन्नत्यांसाठी सातत्याने प्रशासनासोबत पाठपुरावा करत आलेला आहे. सिईओ संजीता महापात्रा यांनी एक महिन्या आधी अ.महा.प्राथ.शिक्षक संघाला निमंत्रित करून सर्व प्रकारच्या पदोन्नत्या करण्यात येतील, असे आश्वासित केले होते.
>
> **किरण पाटील,**
> **जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ.**

# पालकमंत्र्यांना 30 बसगाड्यांची मागणी

## पालकमंत्र्यांना पत्र : अनेक पाड्यांमध्ये बस नाहीच

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 3 ) -** मेळघाटच्या धारणी व चिखलदरा तालुक्यांत अतिदुर्गम आदिवासी पाडे तर सोडाच, अगदी रस्त्यावरील गावांमध्येसुद्धा बस जात नसल्याचे वास्तव आहे. स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सवातही आदिवासींना खासगी वाहनांमधून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. यादरम्यान धारणी व चिखलदरा तालुक्यासाठी मानव विकास संसाधन मंत्रालयामार्फत 30 बसगाड्या देण्याची मागणी मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना एक निवेदनाद्वारे केली.



### अंधारात पायी गाठावे लागते गाव

आजही अनेक आदिवासी पाड्यांमध्ये बस प्रत्यक्ष जात नाही. दीडशेपेक्षा अधिक गावांच्या फाट्यावर बस प्रवाशाला सोडून जाते. तेथून दिवसा व रात्रीही पायी गाव गाठावे लागते.

भंगार बसचे आगार म्हणून कुख्यात परतवाडा आगारात पाच बस नव्याने दाखल झाल्या. परंतु, मेळघाटच्या नशिबी नादुरुस्त व भंगार गाड्याच आहेत. अपघात घडले तरी आदिवासींच्या नशिबी आजही त्या भंगार बस किंवा अवैध प्रवासी वाहनाच्या टपावर, कोंबून प्रवास करावा लागत आहे. मेळघाटच्या नावावर अनेक सुविधा शासन देत असले तरी त्यात मूलभूत सुविधा बेपत्ता असल्याचे चित्र अत्यंत क्लेशदायक आहे. 300 खेडी आणि बारा बस. धारणी व चिखलदरा तालुक्यात दुर्गम-अतिदुर्गम मिळून जवळपास 300 आदिवासी पाडे आहेत. मेळघाटात केवळ 12 ते 15 बस आहेत.

### किमान 30 बस गाड्यांची मागणी

चंद्रपूर जिल्ह्यातील मूल व मेळघाटातील धारणी येथे बस आगार याच सरकारने गतवर्षी मंजूर केले. प्रत्यक्ष कामाला अजूनही सुरुवात झालेली नाही. धारणी व चिखलदरा तालुक्यांत आदिवासींना प्रवास सुविधेसाठी पहिल्या टप्प्यात किमान 30 बसगाड्या देण्याची मागणी आ. केवलराम काळे यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदनातून केली आहे.

# आमदार, खासदारांना पेन्शन तर शिक्षकांना का नाही?

## प्रहार शिक्षक संघटनेच्या विभागस्तरीय शिक्षक समस्या निवारण सभेत शेकडो शिक्षकांची उपस्थिती



### शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर बच्चू कडूंची आक्रमक भूमिका




**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.3 )-** आमदार ,खासदारांना पेन्शन असू शकते तर आपली हयात शासनाच्या कामाकरिता घालवणारे शिक्षकांना जुनी पेन्शन का नको? असा परखड सवाल राज्यकर्त्यांना करत माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर प्रथमच आपली आक्रमक भूमिका व्यक्त केली.

प्रहार शिक्षक संघटनेच्या अमरावती विभागस्तरीय शिक्षक समस्या निवारण सभेचे आयोजन प्रहार शिक्षक संघटनेच्यावतीने कुरळ पूर्णा येथे करण्यात आले होते. या सभेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी राज्यमंत्री तथा प्रहार शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू उपस्थित होते. या सभेला अमरावती विभागातील अमरावती अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व इतर जिल्ह्यातूनही शेकडो शिक्षकांनी उपस्थिती लावली होती. या सभेत शिक्षकांनी अक्षरश: आपल्या समस्यांचा पाऊस पाडला. जिल्हा परिषद, खाजगी, अनुदानित, विनाअनुदानित, महानगरपालिका, नगरपालिका व आश्रम शाळा या विभागात कार्यरत शिक्षक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक शिक्षकांनी आपल्या समस्याचा पाढा बच्चू कडू पुढे मांडला. यावेळी सभेचे प्रास्ताविक या सभेचे निमंत्रक व प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी प्रहार शिक्षक संघटनेची सन 2016 पासून ची वाटचाल विशद करीत सध्या परिस्थितीत शिक्षकांच्या ज्वलंत प्रश्नांचा समस्यांचा पाढा वाचला. तसेच त्यांनी संघटनेचा गेल्या नऊ वर्षाचा कार्य अहवाल संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांना सादर केला. यावेळी मंचावर प्राचार्य डॉ.दीपक धोटे, प्रहार जनशक्ती पक्षाचे राज्य प्रवक्ते जितू दुधाने, कसबे गव्हाण चे सरपंच शशिकांत मंगळे, अचलपूर येथील सेवानिवृत्त शिक्षकांनी उपस्थित होते. याप्रसंगी समस्या निवारण सभेला संबोधित करताना बच्चू कडू यांनी राज्यकर्त्यांचा शिक्षकांच्या समस्यांवर चांगला खरपूस समाचार घेतला. शिक्षकांना जुनी पेन्शन मिळावी, वैद्यकीय देयक तत्काळ देण्यात यावी, शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या, अंतर्गत बदल्या यातील पारदर्शकता कायम रहावी, शिक्षकांकडे अवाजवी कामे काढून घेण्यात यावी, शिक्षकांना मानसिक स्थैर्य मिळावं, आदिवासी भागात कार्यरत शिक्षकांना प्रोत्साहन भत्ता, अतिरिक्त घरभाडे भत्ता मिळावा, वस्ती शाळा शिक्षकांचे प्रश्न खाजगी अनुदानित शाळांना अनुदान, आश्रमशाळा शिक्षकांच्या समस्या, महानगरपालिकेतील शिक्षकांच्या समस्या यावर आपली आक्रमक भूमिका व्यक्त करत येणाऱ्या काळात शिक्षकांच्या समस्या करिता शासन दरबारी मोठे आंदोलन उभे करत, आवाज उठवू आणि बुलंद करू अशी भूमिका यावेळी मांडली. शिक्षकांना नाहक कुणी बदनाम करण्याचा प्रयत्न केल्यास त्यालाही परखडत प्रत्युत्तर देण्यात येणार असल्याचे सांगितले. विभागात 6 आमदार असताना सुद्धा शिक्षकांची समस्या सुटत नाही ही शोकांतिका असल्याची खंत देखील त्यांनी व्यक्त केली. लवकरच शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर एक कृती कार्यक्रम ठरवून समस्यांचा निपटारा करणार असल्याची ग्वाही या सभेच्या प्रसंगी त्यांनी दिली. यावेळी जितू दुधाने डॉक्टर दीपक धोटे यांनी सुद्धा सभेला संबोधित केले. सभेचे संचालन संघटनेचे अकोला जिल्हा कार्याध्यक्ष अमर भागवत व आभार प्रदर्शन विभागीय सचिव अमोल आगे यांनी केले. याप्रसंगी अमरावती भागातील संघटनेतील पाचही जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष सर्वश्री शरद काळे, मंगेश टिकार, महिंद्र रोठे, कुलदीप डंबारे,महादेव ठाकरे, अकोला प्रसिद्धी प्रमुख अमित फेंडर, नागेश जोगदे हेमंत बोरकर यांचा बच्चू कडू यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन उत्कृष्ट संघटनात्मक व शैक्षणिक कामाबद्दल सत्कार करण्यात आला. या सभेला संघटनेचे विभागातील सर्व पदाधिकारी, सभासद आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिक्षकहृदय सम्राट पुरस्कार प्रदान

समस्या निवारण सभेत प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी संघटनेचे विभागातील जिल्हाध्यक्ष व सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये बच्चू कडू यांना शिक्षक हृदय सम्राट हा पुरस्कार प्रदान केला. या पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह शाल व श्रीफळ असे होते. प्रथमच विभागातील कुठल्यातरी लोकप्रतिनिधीला शिक्षकाने कडून शिक्षक उदय सम्राट हा पुरस्कार प्रदान करण्यात आलेला असल्याची चर्चा यावेळी होती.

# रसवंतीच्या मशीनमध्ये पदर अडकून महिलेचा मृत्यू

**परतवाडा -** रसवंतीच्या मशीनमध्ये महिलेच्या साडीचा पदर अडकून झालेल्या अपघातात तिचा मृत्यू झाल्याची घटना कोठारा येथे घडली.

अंजूबाई प्रकाश कुबडे (60) रा. कोठारा असे मृतक महिलेचे नाव आहे. 28 मार्चरोजी सायंकाळी 6. 30 वाजता अंजूबाई ही रसवंतीच्या मशीनवर ऊसाचा रस काढत होती. तेव्हा तिच्या साडीचा पदर मशीनमध्ये अडकला. त्यामुळे ती त्या मशीनमध्ये ओढल्या जाऊन डोक्याला गंभीर मार लागला. या घटनेत तिचा घटनास्थळावरच मृत्यू झाला. अंजूबाई कुबडे हिचा उदरनिर्वाह रसवंतीवरच चालत होता. 28 मार्चरोजी तिने रसवंतीचे दुकान लावून रस काढत होती. दरम्यान हा अपघात झाला. जखमी अवस्थेत तिला तिच्या कुटुंबियांनी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात भरती केले; परंतु डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. घटनेचा पुढील तपास परतवाडा पोलिस करीत आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे श्री. अरुण हिम्मतराव इंगळे यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन – मौजे नेरपिंगळाई, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. 2814. ता. चांदूर बाजार, जिल्हा. अमरावती.

**चर्तु: सीमा:** पूर्व– नत्थूजी वाटकर यांचे घर उत्तर– सरकारी रस्ता
पश्चिम– सुर्जन उके यांचे घर दक्षिण– सरकारी रस्ता

सदर मिळकत नामे श्री. अरुण हिम्मतराव इंगळे यांना ग्रामपंच्यायत नेरपिंगळाई यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे. तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

**आपला**
**ADVOCATE**
**रवींद्र रू. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती**
**मो. नं. 9823698745**

# अस्मिता

## कर्ज घेताय?



लघुउद्योगातून महिलांना चांगलं उत्पन्न मिळवता येतं. अनेक महिला उद्योग सुरू करण्यासाठी कर्ज घेण्याचा विचार करतात. व्यवसायवृद्धीसाठीही असं कर्ज उपयुक्त ठरू शकतं. पण कर्ज घेताना अनेकींच्या मनात धाकधूक असते. म्हणूनच व्यावसायिक कर्जाबाबतचं हे मार्गदर्शन अनेकींना उपयुक्त ठरू शकतं.

अर्थभान

* सर्वात आधी आपली आर्थिक निकड जाणून घ्या. नेमका किती निधी हवा आहे हे ठरवा.

* कर्ज घेताना तुम्हाला व्यावसायिक योजनेची माहिती द्यावी लागेल. त्यामुळे तुम्ही उद्योगाची योजना आखून घ्या.

* व्यावसायिक कर्ज घेताना एखादी मालमत्ता तारण ठेवावी लागते. त्यामुळे अशी मालमत्ता तुमच्याकडे असायला हवी.

* कर्जावरचे व्याजदर जाणून घ्या. सर्वात कमी व्याजदर असणारं कर्ज निवडा.

* कर्जाचा हप्ता कमाईच्या २५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल याची काळजी घ्या.

* व्यवसायाशी संबंधित तीन प्रकारची कर्ज असतात. वर्किंग कॅपिटल लोन, टर्म लोन आणि कॉर्पोरेट टर्म लोन्स. यापैकी एका कर्जाची निवड करु शकता.

* व्यवसायाचा दैनंदिन खर्च भागवण्यासाठी वर्किंग कॅपिटल लोन घेता येईल. याचा कालावधी बारा महिन्यांचा असतो. टर्म लोन एक ते दहा वर्षांच्या कालावधीसाठी असतं. कॉर्पोरेट टर्म लोन ही अधिक कालावधीची कर्ज आहेत. या कर्जाच्या व्याजदरांबाबत वाटाघाटी करता येतात.

**आपल्याला काहीतरी साध्य करण्याची इच्छा असेल तर निसर्गदेखील साथ देतो. आपल्याला फक्त कठोर परिश्रम आणि पूर्ण समर्पणाने काम करण्याची आवश्यकता असते... 'चटौरी रजनी' या विचारांचे मूर्तीमंत उदाहरण दाखवून देतात. त्या अशा समर्पणाचे उदाहरण आहेत ज्यांनी सामान्य गृहिणी असूनही आपल्या स्वयंपाक कौशल्याच्या बळावर जगात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. कुटुंब सांभाळण्याची जबाबदारी असल्यामुळे काम करू शकत नसणाऱ्या किंवा त्यांचे इच्छित छंद जोपासू शकत नाहीत अशा महिलांसाठी 'चटौरी रजनी' एक प्रेरणास्थान आहेत.**

## ...तरीही हार मानली नाही

मानिनी



'चटौरी रजनी' अर्थात रजनी जैन यांच्या जन्म एका मध्यमवर्गीय मारवाडी कुटुंबात झाला. त्यांनी चेन्नईमध्ये शिक्षण पूर्ण केले. परंतु कुटुंबातील अन्य सदस्यांनी त्यांनी नोकरी करणे, पैसे मिळवण्यासाठी घराबाहेर पडणे मान्य नव्हते. म्हणून रजनी यांनी घरी राहूनच स्वयंपाकाचा पुढील कोर्स करण्यास सुरुवात केली. यानंतर २००७ मध्ये त्यांचे लग्न झाले. २००८ मध्ये मुलगा तरणचा जन्म झाला. मात्र बाळंतपणानंतर तीन महिन्यांतच त्यांनी पुन्हा स्वयंपाकाचे वर्ग सुरू केले. रजनीचे पती बँकेत काम करतात. पण लॉकडाऊन दरम्यान पतीची नोकरी गेल्यानंतर रजनीने आपल्या कौशल्याचा वापर करून छंद आणि घरी काम करण्याची इच्छा या दोन्हीचा उत्तम संगम साधला. पतीला चांगली नोकरी मिळाली तर आपण आपले केस अर्पण करु, असा नवस त्यांनी पतीची नोकरी गेल्यानंतर देवाला केला होता. पुढे पतीला नोकरी मिळाली आणि नवस पूर्ण करण्यासाठी रजनीने मुंडन केले. मात्र कापलेले केस पाहून लोक त्यांना पुरूष किंवा षंढ म्हणायचे. पण रजनीने कठोर परिश्रम केले टीकेकडे दुर्लक्ष करत, कामावर लक्ष केंद्रित करुन वेगळी ओळख निर्माण केली.

रजनीने यूट्यूब ब्लॉग लंच बॉक्स रेसिपीजने सुरू केला आणि छोट्या आणि सोप्या रेसिपीज शेअर करायला सुरुवात केली. हळूहळू त्या अन्नसामग्री निर्माती बनल्या. लोकांना त्यांच्या सोप्या पाककृती आवडू लागल्या आणि प्रसिद्ध वाढू लागली. अन्न सामग्रीसोबतच रजनी प्रवास तसेच जीवनशैली ब्लॉग देखील चालवतात. अलिकडेच रजनीच्या आयुष्यात एक दुःखद घटना घडली. खरे तर ती कोणत्याही आईसोबत घडू नये. त्यांचा मुलगा तरण याचा रस्ता अपघातात मृत्यू झाला. मुलगा गमावल्याचे दुःख सहन करणे खरोखर खूप कठीण होते. तरणला त्याची आई रजनीच्या डोळ्यात कधीही अश्रू येऊ नयेत, असे वाटायचे. म्हणूनच त्याच्या इच्छेचा मान राखत अशा बिकट स्थितीतही त्यांनी स्वतःवर नियंत्रण ठेवले. आपल्या मुलाच्या स्मरणार्थ त्यांनी त्याच्या मित्रांसाठी एक पार्टी आयोजित केली आणि त्याद्वारेच मुलाला शेवटचा निरोप दिला. आता त्या पुन्हा एकदा आपल्या छंद आणि व्यवसायाकडे वळल्या आहेत. त्यांच्या पाककृती अनेक घरांमधील लज्जत वाढवतील यात शंका नाही.

## कोणी टाळावे पनीरचे सेवन

स्टे फिट

चीज वा पनीरमध्ये असणारे पोषक घटक आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. त्यात प्रथिने, कॅल्शियम आणि इतर आवश्यक घटक असल्यामुळे हाडे मजबूत होतात आणि शरीराची ताकद वाढवण्यास मदत होते. अर्थात असे असले तरी पनीर सर्वांसाठीच लाभकारक ठरत नाही. त्यामुळेच काही त्रास असल्यास पनीरचे सेवन टाळायला हवे. कारण फायद्याऐवजी त्याचे बरेच दुष्परिणाम होऊ शकतात. म्हणूनच काळजी घ्यायला हवी. अर्थात आधी आपण पनीर खाण्याचे फायदे जाणून घेऊ या.



* **प्रथिनांचा चांगला स्रोत:** पनीरमध्ये भरपूर प्रथिने असतात, जी शरीराच्या स्नायूंच्या निर्मिती आणि दुरुस्तीस मदत करतात.

* **हाडांसाठी फायदेशीर:** यामध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी असते, जे हाडे मजबूत करते. पनीरच्या नियमित सेवनामुळे हाडांचे फ्रॅक्चर आणि इतर समस्या टाळता येतात.

* **त्वचेसाठी फायदेशीर:** पनीरमध्ये त्वचा निरोगी आणि चमकदार ठेवणारी अँटीऑक्सिडंट्स असतात. यामुळे त्वचेचे संक्रमण आणि सुरकुत्या कमी करण्यास मदत होते.

* **पचनक्रियेत मदत:** पनीरच्या सेवनाने पचनसंस्था सुधारते आणि पोटाचे कार्य योग्यरित्या होण्यास मदत होते.

अर्थात असे असले तरी पनीरचे काही धोके संभवतात. जसे की...

**रक्तदाबाच्या रुग्णांसाठी धोका:** पनीरमध्ये सोडियमचे प्रमाण जास्त असते. त्यामुळेच तुम्हाला उच्च रक्तदाब असेल तर पनीरचे सेवन मर्यादित करावे. जास्त पनीर खाल्ल्याने रक्तदाब वाढू शकतो.

***अन्न विषबाधा झालेल्या रुग्णांसाठी हानिकारक:**

अन्न विषबाधा झाल्यास हलका आणि सहज पचणारा आहार घ्यावा. पनीरसारखे प्रथिनेयुक्त पदार्थ, विशेषतः ते योग्यरित्या शिजवले नसतील तर पोटाच्या समस्या आणखी वाढू शकतात. यामुळे अतिसार, पोटदुखी आणि इतर समस्याही उद्भवू शकतात.

* **संसर्ग आणि ॲलर्जीचा धोका**

कच्चे किंवा निकृष्ट दर्जाचे पनीर खाल्ल्याने संसर्ग होऊ शकतो. खेरीज तुम्हाला दुग्धजन्य पदार्थांची ॲलर्जी असेल तर पनीर खाल्ल्याने त्वचेवर पुरळ येणे आणि खाज सुटणे यासारखे परिणाम होऊ शकतात.

## पिग्मेंटेशनमुळे त्रस्त आहात?

स्किन केअर



पिग्मेंटेशन अर्थात त्वचेच्या रंगद्रव्यातील असंतुलनामुळे अनेक महिला चिंताग्रस्त असतात. आजकाल जवळजवळ सर्वांनाच हा त्रास असतो. चेहऱ्यावरील काळे डाग, असमान त्वचा रंग आणि सूर्यप्रकाशामुळे येणारा काळेपणा ही पिग्मेंटेशनची लक्षणे आहेत. तथापि, आता या समस्येपासून मुक्त होणे फारसे कठीण नाही कारण त्वचा नैसर्गिक पद्धतीने सुंदर आणि चमकदार बनवायची असेल तर तुम्ही कच्च्या दुधाचा वापर करु शकता. हा उपाय या समस्येने ग्रस्त महिलांसाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. याविषयी सविस्तर जाणून घेऊ या.

* **कच्चे दूध कसे कार्य करते?**

कच्च्या दुधात कॅल्शियम, लॅक्टिक ॲसिड आणि काही जीवनसत्त्वे यासारखे अनेक पोषक घटक त्वचेसाठी फायदेशीर असतात. लॅक्टिक ॲसिड त्वचेला एक्सफोलिएट करते, मृत पेशी काढून टाकते आणि नवीन त्वचा येण्याची प्रक्रिया वेगाने घडवते. तसेच यामुळे त्वचा मऊ आणि मुलायम होते. कच्चे दूध त्वचेचा नैसर्गिक रंग सुधारण्यासही मदत करते. त्यामुळेच ही समस्या दूर करण्यासाठी त्वचेवर कच्च्या दुधाने मसाज करणे लाभकारक ठरते.

* **हळद आणि कच्चे दूध**

हळदीमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि दाहविरोधी गुणधर्म असून ते त्वचा उजळवतात तसेच जळजळ कमी करतात. हळद आणि कच्च्या दुधाचे मिश्रण पिग्मेंटेशन कमी करण्यास मदत करते. त्यासाठी एक चमचा हळद पावडर घेऊन त्यात दोन-तीन चमचे कच्चे दूध घाला. आता मिश्रण एकजीव करुन चेहऱ्यावर लावा. १५-२० मिनिटांनी कोमट पाण्याने धुवा. हे मिश्रण त्वचेवरील डाग हलके करते. वर्ण सुधारतो.

* **लिंबू आणि कच्चे दूध**

लिंबामध्ये व्हिटॅमिन सी असते. यामुळे त्वचेवरील डाग हलके होण्यास मदत होते. लिंबाचा रस त्वचा उजळवतो तर कच्चे दूध त्वचा हायड्रेट करते. तेव्हा हे लाभ मिळवण्यासाठी अर्ध्या लिंबाचा रस पिळून त्यात एक चमचा कच्चे दूध घाला. ते मिश्रण चेहऱ्यावर लावा आणि १०-१५ मिनिटे तसेच राहू द्या. नंतर चेहरा धुवा. हा फेस पॅक पिग्मेंटेशन कमी करण्यास मदत करतो आणि त्वचा उजळ बनवतो.

* **कच्च्या दुधाचे इतर फायदे**

कच्चे दूध त्वचेला खोलवर हायड्रेट करते. ते ओलावा देत असल्यामुळे त्वचा मऊ आणि चमकदार राहते. कच्चे दूध मृत त्वचेच्या पेशी काढून टाकण्यासही मदत करते. यामुळे त्वचेवरील घाण आणि धूळ निघून जाते आणि त्वचा स्वच्छ आणि ताजी दिसते. तसेच कच्चे दूध चेहऱ्याचा रंग एकसारखा करण्यासही मदत करते. याच्या नियमित मसाजने काळे डाग हलके होतात आणि त्वचेचा रंग एकसारखा होतो.

## फॅशन अँड फिटनेस

स्टाईल



फिटनेससाठी बऱ्याच महिला योगाला प्राधान्य देतात. योगा हा एक व्यायामप्रकार असला तरी आसनं करताना फॅशनेबल रहायला काय हरकत आहे? तुम्हीही योगा क्लासला जात असाल तर स्टायलिंगचे हे फंडे वापरता येतील.

* सध्या स्लीम जॉगर्सचा बोलबाला आहे. या जॉगर्स ट्रॅक पॅंटसारख्याच आरामदायी असतात. शिवाय त्या खूप स्टायलिशही दिसतात. या जॉगर्स अंगाला चिकटून बसत नाहीत. यामुळे शारीरिक हालचाली अगदी सहज करता येतात. यासोबत तुम्ही फ्लिपफ्लॉप्स पेअर करु शकता.

* क्रॉप टॉप्स कायमच इन असतात. ही फॅशन कधीच बाद होत नाही. आधीपासूनच या टॉप्सची चलती आहे. स्लीम जॉगर्सवर बॅगी क्रॉप टॉप्स घालता येतील. फिटनेसच्या क्रेझमुळे क्रॉप टॉप्सना खूप प्रसिद्धी मिळाली आहे. अत्यंत आरामदायी असे हे टॉप्स खूप छान दिसतात.

* ॲथलेजर म्हणजे व्यायामासाठी वापरल्या जाणाऱ्या कपड्यांमध्ये सध्या जीम जीन्सचा भाव वधारला आहे. अत्यंत लवचिक आणि आरामदायी अशा या डेनिम्स योगा सेशनसाठी बेस्ट ठरतात. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनवण्यात आलेल्या या जीन्स झटपट वाळतात. चारही बाजूंनी ताणल्या जातात. यामुळे व्यायाम करताना खूप आरामदायी वाटतं. या जीन्सवर कॉटन टी शर्ट घालता येईल.

* योगा पँट्स किंवा लेगिंग्ज हा देखील चांगला पर्याय आहे. संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी कम्फर्टेबल फॅब्रिकपासून तयार केलेल्या योगा पँट्स वापरणं योग्य ठरतं. या पँट्स घाम शोषून घेत असल्यामुळे त्वचेला त्रास होत नाही.

* तुम्हाला सायकलिंग शॉर्टसही ट्राय करता येतील. सध्या बऱ्याच तारका अशा शॉर्टस कॅरी करताना दिसतात. आंतरराष्ट्रीय स्तरावरही ही फॅशन हिट ठरते आहे. त्यावर हुडीज किंवा टी शर्ट घालता येईल. या शॉर्टस ताणल्या जातात. यामुळे पोटाच्या खालच्या भागाला आकार येतो. तेव्हा हा स्टायलिश आणि सुपर कूल सायकलिंग शॉर्टसचा ऑप्शनही तुम्ही निवडू शकता.

## सूर्यकिरणांचा तिलक

भटकंती

सुट्टीच्या या काळात भटकंती आणि त्यातही धार्मिक स्थळांना भेट देण्याची इच्छा असेल तर आयोध्येचा विचार नक्कीच करता येईल. कारण मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री रामांचे शहर अतिशय अद्भुत दृश्याचे साक्षीदार होत आहे. त्यातही रामनवमीच्या शुभमुहूर्तावर या मंदिराचे सौंदर्य शतपटीने वाढणार आहे. रामनवमीच्या दिवशी सूर्याची किरणे रामलल्लाच्या कपाळावर पडतील आणि आरसे आणि भिंगांनी सज्ज असणाऱ्या एका विस्तृत प्रणालीद्वारे मूर्तीला 'सूर्य तिलक' लावला जाईल. त्यामुळेच प्रत्यक्ष हा सोहळा अनुभवण्याजोगा असेल. एकूणच या सुट्टीत भेट देण्यासाठी तुम्ही या पवित्र स्थळाचा विचार करु शकता.

रामनवमीला भगवान राम सिंहासनावर विराजमान होण्यापूर्वी सूर्याच्या किरणांनी त्यांचे मस्तक सजवले होते, तसेच यावेळीही घडणार आहे. श्री राम नवमीच्या दिवशी भगवान रामाच्या डोक्यावर सूर्यप्रकाश आणला जाईल. रामलल्लाच्या कपाळाच्या मध्यभागी टिळा लावण्यासाठी योग्य कालावधी सुमारे तीन ते साडेतीन मिनिटे असून यामध्ये तब्बल दोन मिनिटे पूर्ण प्रकाश भाळी असेल. गेल्या वेळी याच दिवशी मंदिर ट्रस्टने सुमारे १०० एलईडी बसवले होते आणि सरकारने ५० एलईडी बसवले होते. यावेळीही अशीच तयारी करण्यात आली आहे.



वैदिक कालगणनेनुसार, चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील नवमी तिथी ५ एप्रिल रोजी संध्याकाळी ०७:२६ वाजता सुरू होईल आणि दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ एप्रिल रोजी संध्याकाळी ७:२२ वाजता संपेल. सनातन धर्मात उदय तिथी वैध आहे. म्हणून, रामनवमी ६ एप्रिल रोजी साजरी होत आहे. या शुभ प्रसंगी, राम मंदिराच्या गर्भगृहात असणाऱ्या रामलल्लाच्या मूर्तीच्या कपाळावर सूर्यप्रकाश तिलकासारखा चमकेल. पौराणिक कथेनुसार भगवान श्रीराम सूर्यवंशी होते. म्हणून त्यांना सूर्यटिळक लावण्याची परंपरा आहे.

दरवर्षी रामनवमीच्या दिवशी रामलल्लाच्या मूर्तीच्या कपाळावर सूर्यकिरणांचा तिलक असेल, असे सांगितले जात आहे. यासाठी राम मंदिराच्या तिसऱ्या मजल्यापासून रामलल्लाच्या मूर्तीपर्यंत पाईपिंग आणि ऑप्टो मेकॅनिकल सिस्टीमद्वारे सूर्यकिरण पोहोचतील.

फूट केअर

### जपा पायांचे आरोग्य



उन्हाळ्यात पायांची विशेष काळजी घ्यावी लागते. या दिवसात पायांना घाण लागल्यास जास्त त्रास होतो. सतत धुतल्याने पाय चिकट होतात. यासोबतच घाण पाण्यामुळे जंतूसंसर्गाचा धोकाही वाढतो. हा धोका टाळण्यासाठी तुम्ही नैसर्गिक पॅक तयार करू शकता. त्यासाठी कोरडी मेहंदी घ्या. त्यात गुलाब पाणी घाला. हा पॅक पायांना लावा. वाळल्यावर धुवून टाका. मेहंदीत जखमा बरी करणारे गुणधर्म असल्यामुळे किरकोळ जखमा आणि पायांना पडलेल्या भेगा बऱ्या होऊ शकतात. मुलतानी माती, कडुनिंबाच्या पानांची पूड आणि लवेंडर ऑईल एकत्र करून पॅक बनवा. पायांना लावा. अर्ध्या तासाने धुवा.

हेअर केअर

### केस ठेवा चमकदार



आपले केस मुलायम आणि चमकदार असावेत, अशी प्रत्येकीची अपेक्षा असते. यासाठी काही टिप्स फॉलो करता येतील. बऱ्याच जणी एकाच ब्रँडचा शँपू वापरतात. पण केसांची चमक टिकवण्यासाठी वेळोवेळी शँपू बदलणं गरजेचं असतं. त्यातच केसांवर फार प्रयोग करणं टाळावं. हिटिंग टूल्सचा वापर करू नये. सतत स्ट्रेटनिंग, कर्लिंग केल्याने केसांचा पोत बिघडतो. त्यातला ओलावा कमी होतो.

किचन टिप्स

### झटपट सोला लसूण

लसूण सोलणं हे अनेकींना वैतागवाणं काम वाटतं. एकाच वेळी भरपूर लसूण सोलायचा खूप कंटाळा येतो. अशावेळी काही सोप्या पद्धतींचा अवलंब करून लसूण झटपट सोलता येईल. यासाठी एका भांड्यात थोडं पाणी गरम करा. पाणी कोमट असायला हवं. त्यात लसणाच्या पाकळ्या बुडवून ठेवा. दहा मिनिटांनी पाणी ओतून द्या. लसणाच्या पाकळ्या हातांनी रगडा. यामुळे सालं पटकन निघून जातील.



# मुंबईत पोलिसांकडून हाय अलर्ट जारी

## दहशतवादी हल्ला, व्हीआयपी व्यक्तींना लक्ष्य केले जाण्याची शक्यता, महिनाभर ड्रोनवर बंदी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ :**
मुंबई शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने मुंबई पोलिसांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता मुंबईत महिनाभरसाठी ड्रोन, रिमोट कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर आणि हॉट एअर बलून उडवण्यावर बंदी घातली आहे. यासंदर्भात मुंबई पोलिसांनी एक परिपत्रक जारी केले आहे. ही बंदी ४ एप्रिल पासून ५ मे २०२५ पर्यंत लागू केली जाणार आहे.



पोलिस आयुक्तालायकडून या संदर्भात परिपत्रक जारी करण्यात आले आहे. या परिपत्रकात म्हटले आहे की, दहशतवादी किंवा राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट-कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर आणि हॉट एअर बलूनचा वापर करुन दहशतवादी हल्ला तसेच शहरातील व्हीव्हीआयपी व्यक्तींना लक्ष्य करण्यासाठी करू शकतात.

मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकतात. शहरातील गर्दीची ठिकाणे देखील लक्ष्य केली जाऊ शकतात. सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करू शकतात आणि बृहन्मुंबई पोलिस आयुक्तालय क्षेत्रात कायदाव सुव्यवस्था बिघडवू शकतात. या अनुषंगाने सर्व प्रकारच्या ड्रोन वापरावर बंदी घालण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती दंडनीय असेल, असेही या परिपत्रकात म्हटले आहे. सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, याद्वारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे, असेही परिपत्रकात म्हटले आहे.

काही दिवसांपूर्वीच मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने अंधेरी परिसरातून कुख्यात गुंड बिश्नोई गँगच्या पाच सदस्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ७ पिस्तुले, २१ काडतुसे, एक इंटरनेट डोंगल, एक मोबाईल सीमकार्ड जप्त करण्यात आले आहे. अटक करण्यात आलेल्या सदस्यांचा मुंबईतील एका उद्योगपती आणि अभिनेत्यावर हल्ला करण्याचा कट असल्याचे सांगण्यात आले आहे.

# आता राज्यात कुठेही बसून करता येणार घरांची नोंदणी

## १ मेपासून 'एक राज्य एक नोंदणी' धोरण

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**
महाराष्ट्रात येत्या महाराष्ट्र दिनापासून म्हणजे १ मेपासून ऑनलाईन मुद्रांक नोंदणी व 'एक राज्य एक नोंदणी' उपक्रम राबवण्याची महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी केली.



या उपक्रमामुळे पुण्यात बसून नागपुरातील घराची किंवा मुंबईत बसून पुण्यातील घराची नोंदणी नोंदणी करता येईल. ही सर्व प्रक्रिया फेसलेस असेल, असे ते म्हणाले. या प्रक्रियेमुळे घर खरेदीच्या प्रक्रियेतील दलालीला चाप बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सद्यस्थितीत घराच्या नोंदणीसाठी आपल्याला उपनिबंधक कार्यालयात किंवा तहसील कार्यालयात खेटे मारावे लागतात. अनेकदा या प्रकरणी नागरिकांचा मोठा वेळ व पैसे वाया जातात. या पार्श्वभूमीवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी १ मेपासून राज्यात एक राज्य एक नोंदणी धोरण राबवण्याची घोषणा केली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यासंबंधी म्हणाले, घर खरेदी - विक्री करतेवेळी नोंदणीसाठी सध्या सरकारी कार्यालयात जावे लागते. तिथे अनेक हेलपाटे मारावे लागतात. नोंदणी करतान दलालांचाही अडथळा असतो. त्यावर उपाय म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पारदर्शक व गतीमान सरकारच्या १०० दिवसांचा कार्यक्रम दिला होता.

या अंतर्गत महसूल खात्याचा मुद्रांक निरीक्षकांनी व महानिरीक्षकांनी एक चांगला उपक्रम पुढे आणला आहे. त्यानुसार आपले सरकार एक राज्य एक नोंदणी पद्धत सुरू आहे. या अंतर्गत राज्यातील कुठलीही नोंदणी व मुद्रांक नोंदणी घरी बसून करता येणार आहे.

या योजनेची अधिक माहिती देताना बावनकुळे पुढे म्हणाले, तुम्ही एखादे घर खरेदी केले असेल तर तुम्हाला कुठेही बसून त्याची नोंदणी करता येईल. पुण्यात बसून नागपुरातील घराची किंवा मुंबईत बसून पुण्यातील घराची नोंदणी करता येईल. ही सर्व प्रक्रिया फेसलेस असेल.

आधार कार्ड व प्राप्तिक दस्तऐवजांच्या मदतीने तुम्हाला ही नोंदणी करता येईल. ऑनलाईन मुद्रांक नोंदणीची ही प्रक्रिया आपण १ मेपासून सुरू करत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डिजीटल इंडिया, डिजीटल महाराष्ट्राचा संकल्प केला आहे. आमचे सरकार त्यावर काम करत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे सरकारने प्रायोगिक पातळीवर ही प्रक्रिया मुंबई व उपनगरांत राबवली होती. तिचा आता राज्यभरात विस्तार केला जाणार आहे.

दुसरीकडे, वक्फ सुधारणा विधेयकामुळे गरीब माणसांचे कल्याण होणार असून वक्फ सुधारणा कायद्यांतर्गत ज्या चुकीच्या नोंदी झाल्या आहेत त्या दुरुस्त केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## अनिल अंबानींना २५ हजारांचा दंड

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ :**
एप्रिल २०२२ मध्ये आयकर विभागाने जारी केलेल्या नोटिशीला आव्हान देणाऱ्या उद्योगपती अनिल अंबानी यांच्या याचिकेवर तातडीने सुनावणी करण्याची मागणी केल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना २५,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे.



न्यायाधीश महेश एस. सोनक आणि जितेंद्र एस. जैन यांच्या न्याय पीठाने अंबानी यांच्या याचिकेवर हा आदेश दिला. यामध्ये न्यायालयाने असे नमूद केले की, त्यांचे वकील गुंजन कक्कड यांनी १२ एप्रिल २०२२ रोजी वादग्रस्त नोटीस जारी केली असली तरी, प्रकरणाची तातडीने सुनावणीची विनंती केली होती.

या संदर्भात न्याय पीठाने म्हटले आहे की, प्रकरणात तातडीने सुनावणीची सुविधा अशी कृत्रिम निकड निर्माण करून लागू केली जाऊ शकत नाही. याशिवाय, आव्हान फक्त कारणे दाखवा नोटीस देण्याचे आहे.

याचिकाकर्त्याने मूल्यांकनाची मुदत संपण्याची शक्यता असताना, अंतिम टप्प्यात न्यायालयात धाव घेतली आहे. न्याय पीठाने अनिल अंबानींना ऑर्डरच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या आत टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलला रक्कम देण्यास सांगितले.

## वडेट्टीवार, आशिष शेलार गुप्त बैठकीने राजकीय वर्तुळात खळबळ

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**
विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार विजय वडेट्टीवार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेशाची जोरदार चर्चा सुरू होती.

ही चर्चा मागे पडत नाही तोच भाजप मुंबई शहर अध्यक्ष तथा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार, काँग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार व त्यांचे कट्टर राजकीय विरोधक चिमुरचे आमदार कीतीर्कुमार भांगडीया यांनी एकाच गाडीतून प्रवास करीत मूल एमआयडीसी येथील वडेट्टीवार यांच्या इथेनॉल फॅक्टरत बैठक घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान वडेट्टीवार यांचा राजकीय प्रवास नेमका कुठल्या दिशेने सुरू आहे याबाबत देखील राजकीय वतुर्ळात तर्कवितर्क सुरू आहेत. विशेष म्हणजे वडेट्टीवार यांच्या इथेनॉल कारखान्याचे उद्घाटन लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार असल्याची माहिती आहे.



राज्याच्या विरोधी पक्षातील वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार आणि भाजप मंत्री आशिष शेलार यांच्या गुप्त बैठकीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. असा अंदाज वर्तवला जात आहे की लवकरच महाराष्ट्राच्या राजकीय पटावर मोठी उलथापालथ होऊ शकते.

या राजकीय घडामोडींची सुरुवात त्यावेळी झाली जेव्हा मंत्री आशिष शेलार गुढी पाडण्याच्या दिवशी ३१ मार्च रोजी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. नागपूरहून चंद्रपूरकडे जाताना ते नागभीड येथे थांबले, जिथे आधीपासूनच भाजप चिमूर विधानसभा आमदार कीर्तीकुमार ऊर्फ बंटी भांगडिया उपस्थित होते. मात्र विजय वडेट्टीवार यांनी स्वतःची गाडी सोडून शेलार आणि भांगडिया यांच्या (वाहन क्रमांक २६२७) गाडीत बसून त्यांच्यासोबत मूलपर्यंत प्रवास केला!

या प्रवासानंतर तिन्ही नेते विजय वडेट्टीवार यांच्या मूल एमआयडीसी परिसरातील इथेनॉल प्रोजेक्ट साइटवर पोहोचले, जिथे बंद दाराआड एक दीर्घ बैठक झाली अशी माहिती पुढे येत असून, या बैठकीचे फोटो समोर आले आहेत. परिणामी, चांगलीच चर्चा रंगली आहे.

# वीजबील स्वस्त करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा हवेतच

## अतुल लोंढे यांचे सरकारवर टीकास्त्र

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३ :**
भारतीय जनता पक्ष युती सरकार राज्यातील जनतेची घोर फसवणूक करत आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्यास सरकारने चालढकल चालवली आहे. शेतकरी कर्जमाफी देण्यासही सरकार तयार नाही आणि १ एप्रिलपासून २०२५ पासून वीज बिल स्वस्त केले जाईल ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली घोषणाही फुसका बारच निघाला असून सर्वसामान्य जनतेला मात्र वीज बिलाचा शॉक सहन करावा लागणार आहे, असे प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी एका चित्रफीतद्वारे म्हटले आहे.



अतुल लोंढे पुढे म्हणाले की, वीज क्षेत्रात महाराष्ट्र सरकारच्या महानिमिर्ती, महापारेषण व महावितरण या तीन कंपन्या आहेत. या तीनही कंपन्यांचे मालक राज्य सरकार आहे. वीज बिलासंदर्भातला प्रस्ताव वीज नियामक आयोगाकडे जातो आणि विज नियामक आयोग वीज बिल वाढवायचे किंवा कमी करायचे हे ठरवतो.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १ एप्रिल २०२५ पासून पुढील पाच वर्षात वीज बिल कमी कमी केले जाईल असे २८ मार्च रोजी वचन दिले होते. आणि २८ मार्चला वीज नियामक आयागानेही १ एप्रिलपासून १० टक्के वीज बील कमी होईल असे जाहीर केले होते. पण महावितरण या सरकारच्या कंपनीने यावर आक्षेप घेतला आणि वीज कंपनीवर ९० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्तीचा बोजा आहे, वीज बिल कमी केले तर कंपनी तोट्यात जाऊ शकते असे सांगितले.

मग प्रश्न असा पडतो की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज स्वस्त करण्याची घोषणा करताना त्यांच्या विभागाची माहिती नव्हती का? का आयोगानेच १० टक्के वीज बिल कमी करण्याची घोषणा केली होती? असे प्रश्न लोंढे यांनी उपस्थित केले आहेत.

विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ, लाडक्या बहिणांनी १५०० रुपयावरून २१०० रुपये देऊ, २.५ लाख सरकारी रिक्त पदे भरू असे बेरोजगारांना आश्वासन दिले होते. पण सत्ता मिळाल्यानंतर सत्तेतील तीन भावांची भाषा बदलली आहे. शेतकरी, भगिनी व तरुणांची फसवणूक केल्यानंतर या तीन भावांनी सर्वसामान्य वीज ग्राहकांनाचीही घोर फसवणूक केली असून जनतेला भरमसाठ वीज बिल भरल्याशिवाय गत्यंतर नाही असेही अतुल लोंढे म्हणाले.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २८ मार्च २०२५ रोजी जाहीर झालेल्या वीज दर आदेशाला स्थिगती दिली. हा आदेश १ एप्रिल २०२५ पासून लागू होणार होता.

## मानसिक रुग्णांचा आधार अमृतवाहिनी

अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ ही महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील बेघर, सोडून दिलेल्या रस्त्याच्या कडेला असलेल्या मानसिक रुग्णांच्या पुनर्वसनासाठी समर्पितपणे काम करणारी एक स्वयंसेवी संस्था आहे. मानवसेवा प्रकल्पात ६० रुग्ण आहेत आणि आतापर्यंत सुमारे २५०० रुग्णांना त्यांच्या कुटुंबियांशी यशस्वीरित्या पुनर्मिलन करण्यात आले आहे. श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ स्थलांतरित कामगारांमध्ये एसटीआय/एचआयव्ही एड्स प्रतिबंध नियंत्रणासाठी काम करत आहे.




श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाने अहमदनगर शहरात आणि संपूर्ण जिल्ह्यात मानसिकदृष्ट्या आजारी रस्त्याच्या कडेला असलेल्या बेघर लोकांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे जिथे रुग्णांची संख्या १०८० आहे ज्यामध्ये ३८० महिला आणि ७०० पुरुष आहेत.

हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे. लोकांना तीव्र कामगार समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. रुग्ण रस्त्यावर फिरत आहेत आणि मानसिक स्थितीच्या धोक्याच्या परिस्थितीत आहेत. म्हणूनच संघटना त्यांना काही अधिक वैद्यकीय आणि मानसिक माहिती देऊ इच्छिते ज्यामुळे त्यांना स्थिरता आणि शारीरिक विश्रांती मिळण्यास मदत होईल.

**लोकजागर**

आजाराची संख्या आणि गांभीर्य लक्षात घेता अहमदनगर शहर आणि जिल्ह्याच्या पातळीवर अशा रुग्णांची ओळख, बचाव, समुपदेशन उपचार आणि पुनर्मिलन आणि काही प्रमाणात पुनर्वसन या पातळीवर हस्तक्षेप करणे काळाची तातडीची गरज आहे. या चारही पातळ्यांवर असे हस्तक्षेप करता येईल जिथे हा प्रकल्प सोडून दिलेल्या आणि विस्थापित रुग्णांना आणि पालकांना मानवी पातळीवर कायमस्वरूपी एकत्र आणण्यासाठी उत्प्रेरक ठरेल.

अहमदनगर जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागात बेघर लोक फिरत असल्याने, संस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीला घेऊन सर्व स्तरांवर त्याची ओळख पटवणे आणि कुटुंबांकडून किंवा विशिष्ट कालावधीत ओळख पटली नसल्यास सरकारकडून परवानगी घेणे आणि नंतर पुढील प्रक्रिया सुरू करणे हा पहिलाच हस्तक्षेप असेल. ओळख पटल्यानंतर आणि काही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थेच्या केंद्रस्थानी त्या व्यक्तीवर उपचार सुरू केले जातील. यासाठी संस्थेने अहमदनगर येथील क्षीरसागर रुग्णालयाशी करार केला आहे. डॉ. क्षीरसागर मानसोपचारात एमडी आहेत.

ही प्रक्रिया व्यक्तीच्या मानसिक समाधानाच्या विशिष्ट पातळीवर सुरू होईल. ती प्रथम पुनर्मिलनाच्या दिशेने राबवली जाईल आणि जर ती कार्यक्षम नसेल तर त्या व्यक्तीला कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी पाठवले जाईल.

जर एखाद्या व्यक्तीचा उपचाराने विकास झाला आणि जर त्या व्यक्तीचे कुटुंब चांगल्या आणि स्वीकारार्ह परिस्थितीत आढळले तर त्या व्यक्तीला कुटुंबांकडे सोपवले जाईल. श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळात प्रशिक्षित झालेल्या अनेक रहिवाशांचे आता पुनर्वसन झाले आहे आणि ते फायदेशीरपणे रोजगार मिळवत आहेत. आता कौशल्य प्रशिक्षणावर अधिक भर दिल्याने, प्लेसमेंट सेवा मजबूत करण्यासाठी आणि व्यावसायिक प्रशिक्षणाची व्याप्ती वाढवण्याच्या योजना सुरू आहेत. ■ ■

**शब्दार्थ**
**JCB**
खरं तर, आपण ज्या मशीनला जेसीबी म्हणता, त्या मशीनचं नाव जेसीबी नाही; जेसीबी हे मशीन तयार करणाऱ्या एका कंपनीचं नाव असून, कंपनीचे मालक व ब्रिटिश अब्जाधीश जोसेफ सिरिल बामफोर्ड यांचं नाव आहे. त्यांच्या नावाचा शॉर्ट फॉर्म जेसीबी, असा होतो. ■ ■

## बांबूची यशस्वी शेती

अलीकडच्या काळात तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर शेतीकडे वळत आहे. शेतीत काहीतरी नवीन करायचं म्हणून नाशिकच्या एका आयटीच्या तरुणाने बांबूची शेती उभारून नवा पर्याय उभा केला आहे.

नाशिक जिल्ह्यातीलच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील तळेगाव येथील असलेला प्रशांत दाते याने बांबू शेतीत उतरून प्रगतशील शेतकरी म्हणून नावारुपाला आलेला आहे.

सध्या प्रशांत हा लाखलगाव (रामाचे) येथील प्रगतशील युवा शेतकरी म्हणून ओळखला जातो. द्राक्ष शेतीत नुकसानीपासून दूर राहण्यासाठी शाश्वत शेतीचा नवा पर्याय म्हणून बांबू पिकाची शेती करण्याचा धाडसी निर्णय घेतला. आजघडीला नाशिक जिल्ह्यासह महाराष्ट्रभर त्याची बांबू शेती प्रसिद्ध झाली आहे. आता पुण्यात थेट शंभर एकरवर बांबू लागवड करण्याचा मानस प्रशांतने बोलून दाखविला.




सुरवातीच्या काळात अमरावती, दापोली कृषी विद्यापीठातील बांबू रोपवाटिकेस भेट देऊन माहिती घेतली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रानबाभळी येथील शेतकऱ्याकडून बांबूच्या माणगा जातीच्या ५०० कंद खरेदी करून त्या प्रजातीची लागवड १ एकर शेतावर केली. एक लाख रुपयांचे भांडवल गुंतवून आतापर्यंत सात लाखांचे रोप तयार केले. त्यांनी महाराष्ट्र बांबू विकास महामंडळासह विविध संस्था व बांबू संशोधन संस्थेत जाऊन बांबू शेतीबाबतची माहिती घेऊन बांबूच्या विविध १४ प्रजातीचे संवर्धन केले.

स्वतःच्या शेतावर बांबू ऑक्सिजन पार्क ही संकल्पना राबवून हॉटेल व लॉजिंग व्यवसाय सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यातून अर्थार्जनाला नवी संधी निर्माण होईल. सध्या त्यांनी पुणे जिल्ह्यात 100 एकर शेती भाडेतत्त्वावर करार पद्धतीने घेऊन 100 एकर बांबू शेती उभी करण्याचा प्रयत्न सुरू व भविष्यात इथेनॉलसारखा प्रकल्प राबवण्याचा त्यांचा मानस आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# नकली नोटांचे रॅकेट!

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ३ :**
एका बँकेचा कर्मचारी व अधिकाऱ्यांनी दक्षता बाळगल्याने नकली नोटाचे एक मोठे रॅकेट (टोळी) पोलिसांच्या हाती लागले आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता दहशतवाद विरोधी पथकाने देखील लोणार मध्ये दाखल होत आरोपीची चौकशी केली आहे. लोणार पोलिसांनी आतापर्यंत ५ आरोपींना अटक केली आहे. यातील एक आरोपी उच्च शिक्षित देखील आहे. आरोपी लोणार आणि लोणार तालुक्यातील सुलतानपूर येथील राहणारे आहेत. यात आणखी आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता असून, या आरोपीचे मोठ्या संघटनेशी संबंध असण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. त्यामुळे या संवेदनशील प्रकरणाचे एकूणच गांभीर्य लक्षात घेता लोणार पोलिसांनी या प्रकरणात कमालीची गोपनीयता बाळगली आहे.

बुधवार २ एप्रिल रोजी दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) लोणार मध्ये दाखल झाले होते. त्यांनी देखील आरोपींची कसून चौकशी केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देश विघातक कृत्यांमध्ये हे आरोपी सहभागी आहेत का? या दृष्टीने दहशतवाद विरोधी पथकाने आरोपींची चौकशी केली आहे.

# इरादे खंजर के तो नेक नहीं हो सकते...

## वक्फ दुरुस्ती विधेयकावर अबू आझमींची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**
इरादे खंजर के तो नेक नहीं हो सकते, असे म्हणत समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी केंद्र सरकारच्या वक्फ दुरुस्ती विधेयकावर तसेच केंद्र सरकारवर टीका केली आहे. बुधवारी रात्री उशिरा वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाले आहे. त्यानंतर विरोधकांनी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. यावर आमदार अबू आझमी यांनी प्रतिक्रिया देत सरकारवर टीका केली आहे.

पत्रकारांशी बोलताना अबू आझमी म्हणाले, इरादे खंजर के नेक नहीं हो सकते. ज्या लोकांनी सरकार आल्यानंतर सुद्धा मुस्लिमांच्या हिताचे एकही काम नाही केले मुस्लिमांच्या मशिदींच्या खाली मंदिर शोधत आहेत. मंदिर भरल्यानंतर बाहेर प्रार्थना करण्यासाठी लोक उभे राहू शकतात. पण मशिदी भरल्यानंतर मुस्लिम लोक बाहेर नमाज नाही अदा करू शकत. जर तसे केले तर परवाना रद्द केले जात आहे. हे लोक जे विधेयक आणत आहेत ते मुस्लिमांच्या हिताचे असूच शकत नाही, असे अबू आझमी म्हणाले.



पुढे बोलताना अबू आझमी म्हणाले, त्यांना आमच्या या जमिनी बळकावयाच्या आहेत. आमच्या पूर्वजांनी ज्या जमिनी मशिदींसाठी, स्मशानभूमीसाठी जे वक्फ घेतले होते त्यावर यांचा डोळा आहे. हे लोक मुस्लिमांच्या हिताचे कधीच काम करू शकत नाहीत. आजपर्यंत त्यांनी जे काही काम केले आहे ते सगळे मुस्लिमांच्या विरोधात केले आहे, असा आरोपही अबू आझमी यांनी केला आहे.

अबू आझमी म्हणाले, या देशाला हिंदू राष्ट्र बनवण्यासाठी यांचे हे पाऊल पडत आहे ते मुस्लिमांवर अन्याय केला जात आहे. राज्यसभेत देखील हे विधेयक मंजूर होणार आहे कारण त्यांच्याकडे बहुमत आहे. मी पक्षातील वरिष्ठांशी बोलून पुढील भूमिका ठरवणार आहे. देशात देखील यांचे बहुमत आहे, त्याच आधारे तर बाबरी मशिदीत मंदिर बनवण्यात आले आहे. मात्र, आम्ही या विधेयकाचा विरोध करणार आणि करत राहणार, असे अबू आझमी म्हणाले.

**रझा अकादमी आक्रमक**

रझा अकादमीने वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत पारित झाल्याच्या मुद्यावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. आम्हाला हे विधेयक मान्य नाही. या प्रकरणी आम्ही वेळ पडली तर रस्त्यावर उतरू, तसेच सुप्रीम कोर्टाचेही दार ठोठावू. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर जे मुस्लिम आनंद व्यक्त करत आहेत, ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या इशाऱ्यावर नाचत आहेत. ९९ टक्के मुस्लिम या विधेयकामुळे नाराज झालेत, ही वस्तुस्थिती आहे, असे या संघटनेने म्हटले आहे.

लोकसभेने बुधवारी मध्यरात्री उशिरा वक्फ सुधारणा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. त्यानंतर रझा अकादमीने गुरुवारी मुंबईत एका बैठकीचे आयोजन केले होते. त्यात अनेक मौलवी व मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते हजर होते. या सर्वांनी वक्फ सुधारणा विधेयकाला कडाडून विरोध केला.